रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक १४० | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## प्रियकराची आत्महत्या

| लोणावळा | प्रतिनिधी |

चाकणमधील २७ वर्षीय तरुणाने प्रेम प्रकरणातून लोणावळ्यातील राजमाची दरीत उडी घेऊन जीवन संपवल्याची घटना समोर आली आहे. सूर्यकांत रामदयाल प्रजापती या तरुणाचा मृतदेह तब्बल ३७० फूट खोल दरीत आढळला आहे. धक्कादायक म्हणजे सूर्यकांतने जीवन संपवण्यापूर्वी अवघ्या दोन सेकंदाचा व्हिडिओ बनवून तो घरी ठेवलेल्या मोबाईलवर पाठवला होता. याच व्हिडिओद्वारे आणि लोकेशनवरून लोणावळा शिवदुर्गच्या पथकाने पोलिसांच्या मदतीने मृतदेहाचा शोध घेऊन बाहेर काढला आहे. सूर्यकांतला त्याच्या प्रेयसीचं दुसऱ्या तरुणाशी प्रेमप्रकरण असल्याचा संशय होता. याच नैराश्येतून त्याने हे कृत्य केले.


# कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. १८ऑक्टोबर २०२४

किंमत ४ ₹


## पोलिसांची साप्ताहिक सुट्टीसह रजा बंद

| मुंबई | प्रतिनिधी |

राज्यातील विधानसभा निवडणुकांची घोषणा करण्यात आली आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी रणनिती आखण्यास सुरुवात केली आहे. तर प्रशासकीय कामांना वेग आला आहे. निवडणुका जाहीर होताच आता पोलिसांचीही कामे वाढणार आहेत. मुंबईसह राज्य पोलीस दलात कार्यरत असलेल्या पोलिसांच्या साप्ताहिक सुट्टीसह रजा बंद केल्या आहेत. पोलीस महासंचालक कार्यालयाने मंगळवारी एक परिपत्रक जारी करत हे आदेश दिले आहेत. रजा बंदीमधून वैद्यकीय रजा आणि अत्यावश्यक कारणांसाठीच्या रजा वगळण्यात आल्या आहेत.

### वे|ध|क

## बांगलादेशींना भारतीय ओळख मिळणार?

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

सर्वोच्चन्यायालयानेनागरिकता अधिनियम कलम ६ ची वैधता कायम ठेवण्याचा निर्णय दिला आहे. १९८५ च्या आसाम करारानुसार हे कलम आणण्यात आलं होतं. त्या करारानुसार १९७१ पूर्वी भारतात आलेल्या बांगलादेशी नागरिकांना भारतीय नागरिकत्व मिळणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने ४-१ अशा बहुमताने हे कलम कायम ठेवलं आहे. या प्रकरणाची सुनावणी सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांच्या खंडपीठासमोर पार पडली. १२ डिसेंबर २०२३ या दिवशी १७ याचिकांची सुनावणी झाली. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणावरचा निर्णय राखून ठेवला होता.

## भाग्यश्री नवटाकेंवर गुन्हा दाखल

| जळगाव | वृत्तसंस्था |

जळगावमधील भाईचंद हिराचंद रायसोनी पतसंस्थेतील गैरव्यवहार प्रकरणात संशयित आरोपी सुनील झंवर तसेच कुणाल शाह यांनी पोलीस महासंचालकांकडे दिलेल्या तक्रार अर्जावरून पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेतील तत्कालीन पोलीस उपायुक्त भाग्यश्री नवटाके यांच्याविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली होती. या गुन्ह्याचा तपास सीबीआयकडे सोपवण्यात आला. त्यानंतर सीबीआयने याप्रकरणी मोठी कारवाई केली आहे. फसवणूक आणि गुन्हेगारी कट रचल्याप्रकरणी सीबीआयने नवटाकेंविरोधात गुन्हा दाखल केला आहे. नवटाके यांनी १,२०० कोटी रुपयांच्या कथित फसवणुकीच्या प्रकरणाचा तपास करणाऱ्या पथकाचं नेतृत्व केलं होतं. यात त्यांनी उचित कारवाई केली नसल्याचा त्यांच्यावर ठपका ठेवण्यात आला आहे. त्यांनी यामध्ये आरोपींना वाचवण्याचा प्रयत्न केल्याचाही आरोप होत आहे.

# शेतकऱ्यांचा निर्धार, दळवी हद्दपार?

| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |

**अनेकदा मागणी करुनही शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करुन त्यांना देशोधडीला लावणाऱ्या महायुतीविरोधात शेतकरी आता चांगलाच पेटून उठला आहे. शेतकऱ्यांना पायाखाली तुडवून भांडवलदारांपुढे चपला झिजविणाऱ्या सत्ताधाऱ्यांना धडा शिकविण्यासाठी रायगड जिल्ह्यातील साळाव प्रकल्प-प्रभावित सहा गावांतील ५ हजाराहून अधिक शेतकऱ्यांनी आगामी विधानसभा निवडणुकांमध्ये महायुतीच्या उमेदवारांवर बहिष्कार टाकण्याची मोहीम सुरू केली आहे. सध्याचे महायुतीचे आ. महेंद्र दळवी यांच्याविरोधातही तीव्र नाराजी असून त्यांना हद्दपार करण्याची भूमिका शेतकऱ्यांनी घेतली आहे.**



### जिल्हाधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

१०२५ एकर जमिनीपैकी ७७५ एकर जमिन आजही पडून आहे. महाराष्ट्र जमीन अधिग्रहण अधिनियमानूसार अप्रयुक्त जमिनी मुळ मालकांना परत करण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहे. मात्र याकडे त्यांनीही दुर्लक्ष केल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

### शेतकऱ्यांच्या मागण्या

१. ७७५ एकर न वापरलेली जमीन परत मिळावी.

२. गेल्या ३२ वर्षांच्या उपजीविकेसाठी नुकसानभरपाई मिळावी.

३. १९८९ आणि २००९ मध्ये केलेल्या रोजगार आणि भरपाई संबंधित करारांची त्वरित अंमलबजावणी व्हावी.

४. जेएसडब्ल्यू स्टील लिमिटेड, स्थानिक राजकारणी आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यातील संगनमताची अधिकृत चौकशी करावी.

जेएसडब्ल्यू कंपनीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी २२ नोव्हेंबर २०२२ रोजी आणि जिल्हाधिकाऱ्यांशी २१ फेब्रुवारी २०२३ रोजी बैठक झाली असल्याचा चुकीचा दावा केला. तथापि, या बैठका कधीही झाल्या नव्हत्या हे स्पष्ट झाले.

### शेतकरी प्रतिक्षेत

**२९ जुलै २०२४ रोजी शेतकऱ्यांच्या चर्चेसाठी महत्त्वाची बैठक बोलाविण्यात आली होती. यावेळी सरकारी अधिकारी मंत्र्यांना मंत्रालयात भेट देत होते परंतु शेतकऱ्यांना ते भेटले नाही व काही न कळविता बैठक रद्द केली गेली. यावरुन हे सरकार भ्रष्टाचारी असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. याशिवाय २ सप्टेंबर २०२४ रोजी आंदोलनात कधीही सहभागी न झालेल्या दलालांना घेऊन सरकारने बैठक घेतल्याचेही शेतकऱ्यांकडून सांगण्यात आले.**

याबाबत चेहेर, मिठेखार, वाघूळवाडी, नवीन चेहर, साळाव, निडी प्रकल्पग्रस्त शेतकरी समन्वय संघर्ष समितीने गुरुवारी (दि.१७) पत्रकार परिषद घेतली. यावेळी ॲड. असीम सरोदे, ॲड. सिद्धार्थ इंगळे, सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर, शेतकरी प्रतिनिधी महेंद्र साटमकर, निलेश ठाकूर, मंगेश गायकर, रामा गायकर, दीपक रोटकर यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**काय आहे प्रकरण?**

हे सरकार, विशेषतः उद्योगमंत्री उदय सामंत, जेएसडब्ल्यू स्टील लिमिटेडच्या बाजूने आहेत. त्यांनी भूमी अधिग्रहण आणि रोजगारासंबंधीच्या वैध मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष केले आहे. हे आंदोलन १९८९ पासूनच सुरू झाले. जेव्हा महाराष्ट्र सरकारने SICOM च्या माध्यमातून, चेहर, मिठेखार, साळाव, निडी, वाघुळवाडी आणि नविन चेहेर या मागास भागातील ५३० एकर शेतजमीन आद्योगिक विकासासाठी अधिग्रहित केली. विक्रम इस्पात प्रकल्पाच्या औद्योगिक विकासाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने ग्रासिम इंडस्ट्रीज लिमिटेडच्या माध्यमातून या जमिनीवर ग्रासिमसाठी ९९ वर्षांचा भाडेकरार करण्यात आला. यामध्ये शेतकऱ्यांसाठी कायमचा रोजगार पान २ वर

## नैना प्रकल्प बाधितांची लोक आयुक्ताकडे धाव

### निवृत्त न्यायमूर्ती व्ही. एम. कानडे यांच्याकडे तक्रार दाखल

| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

राज्यात विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजण्यापूर्वी महाराष्ट्र सरकारकडून शेकडो निर्णय घेण्यात आले. अनेक महामंडळाच्या नेमणूका जाहीर केल्या. राज्यपाल नियुक्त विधान परिषद आमदारांच्या नियुक्त्या झाल्या. परंतु राज्य सरकारने पनवेलच्या २३ गावातील भूमिपत्र असलेल्या शेतकऱ्यांवर होणारा अन्याय मात्र सोडविता आला नसून सिडको नैना प्रकल्पाच्या विरोधात आगरी सेना मुंबई अध्यक्ष जयेंद्र खुणे यांच्या नेतृत्वाखाली व नैना प्रकल्प बाधित शेतकरी समितीचे अध्यक्ष वामन शेळके यांच्या अध्यक्षतेखाली नैना सिडको प्रकल्पच्या विरोधात



व पनवेलच्या शेतकऱ्यांना न्याय मिळावा, म्हणून महाराष्ट्र राज्याचे लोक आयुक्ताकडे धाव घेतली आहे.

नवी मुंबई विमानतळ होत असल्याने विकासाच्या नावाखाली पनवेल मधील २३ गावातील मूळ भूमिपुत्र असलेल्या ग्रामस्थ्यांच्या शेतजमिनीवर विविध प्रकारची आरक्षणे टाकून शेतजमिनी हस्तांतरित करून शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचे कुटील कारस्थान काही लोकप्रतिनिधी, बांधकाम व्यावसायिक व सिडको, नैना प्रकल्प अधिकारी करीत असल्याचे निवृत्त न्यायमूर्ती व्ही.एम. कानडे (लोकआयुक्त, महाराष्ट्र राज्य) यांच्या निदर्शनास आणून दिले. लोकआयुक्त कार्यालयाच्या दालनात बुधवारी दुपारी सुनावणीच्या दरम्यान रीतसर चर्चाविनिमय करून तक्रार दाखल केली. नैना प्रकल्पामुळे स्थानिक भूमिपुत्र शेतकऱ्यांची शेतजमीन उध्वस्त होऊन गावकरी देशोधडीला लागून उपासमारीची वेळ येणार असल्याबाबतही चर्चा केली.

शेतकऱ्यांनी नैनाला आपल्या मालकीच्या शेतजमिनी विकल्या नसतानाही राजकीय व्यक्तींच्या सांगण्यावरून नैना अधिकारी व कर्मचारी शेतकऱ्यांच्या गावात व जमिनीवर पान २ वर

## वाहनाच्या धडकेने दुचाकीस्वाराचा मृत्यू

| माणगाव | प्रतिनिधी |

माणगाव-पुणे रस्त्यावर खर्डी गावच्या हद्दीत साबळे क्रेशरजवळ भरधाव वेगाने आलेल्या अज्ञात वाहनाच्या धडकेने दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. ही घटना गुरूवारी (दि.१७) सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास घडली. या अपघाताच्या गुन्ह्याची फिर्याद सहदेव रामचंद्र सोंडकर यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली. मधुकर रामचंद्र सोंडकर हे आपल्या ताब्यातील दुचाकीने निजामपूर ते माणगाव जात असताना त्यांची गाडी साबळे क्रेशर जवळील वळणाच्या रस्त्यावर आल्यावर समोरून येणाऱ्या अज्ञात वाहनावरील चालकाने त्यांच्या ताब्यातील वाहन स्कुटीला धडकून अपघात घडला. पान २ वर

## माजी आ. भोईर यांना जामीन मंजूर

| अलिबाग | प्रतिनिधी |

राज्यात निवडणूकीचे वारे जोरदार सुरु आहेत. सर्वत्र उमेदवारांच्या प्रचाराला प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या सुरुवात झाली आहे. अशातच उरण विधानसभा मतदारसंघात ठाकरे गटाकडून इच्छूक असणारे माजी आ. मनोहर भोईर यांना बुधवारी (दि.१६) रात्री पोलिसांनी अटक केली आहे. त्यामुळे राजकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे. नवी मुंबई पोलिसांनी ही कारवाई केली आहे.



२००७ मध्ये सरकारी कामात हस्तक्षेप केल्याप्रकरणी आरोपीच्या पिंजऱ्यात असलेल्या मनोहर भोईरांवर पोलिसांनी बुधवारी रात्री अटकेची कारवाई केली आहे. त्यांच्यासह तालुकाप्रमुख संतोष ठाकूर व पाच कार्यकर्त्यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. अनेक वर्षे सुनावणीला हजर न राहिल्याने न्यायालयाने ही शिक्षा दिल्याची माहिती समोर आली आहे. त्यांना न्यायलयीन कोठडी सुनावण्यात आली असून त्यांची रवानगी तळोजा कारागृहात करण्यात आली आहे.

विधानसभा निवडणूक तोंडावर आली असताना ठाकरे गटाच्या संभाव्य उमेदवारावर झालेली कारवाई हा ठाकरे गटासाठी मोठा धक्का मानला जात पान २ वर

## पनवेलमध्ये अजितदादा गटात उलथापालथ

| पनवेल | वार्ताहर |

राज्याच्या निवडणुकीचा निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच राजकीय घडामोडींना वेग येऊ लागला आहे. प्रत्येक राजकीय पक्षात वरिष्ठ नेत्यांकडून उमेदवारांना व पदाधिकाऱ्यांना बळ दिले जात असतानाच पनवेल शहर जिल्ह्यातील अजित पवारांच्या राष्ट्रवादीत नाराजीचा सुर उमटू लागल्याचे समोर येत आहे. राष्ट्रवादी पक्षातील प्रमुख पदाधिकारी व ज्येष्ठ कार्यकर्ते विद्यमान जिल्हाध्यक्षांविरोधात एकवटले असून कोणत्याही क्षणी मोठी उलथापालथ होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

पनवेल विधानसभा मतदारसंघात अजित पवार यांच्या राष्ट्रवादीतील प्रमुख पदाधिकारी व शेकडो कार्यकर्ते पक्षाला सोडचिठ्ठी देण्याच्या तयारीत असल्याचे दिसून येत आहे. या परिस्थितीला पनवेल शहर जिल्हाध्यक्ष जबाबदार असल्याचे खासगीत बोलले जात आहे. गेल्या काही दिवसांपासून पक्षातील प्रमुख पदाधिकाऱ्यांनी जिल्हाध्यक्ष महादेव पाटील यांच्याविरोधात नाराजी व्यक्त केली होती. याबाबत पक्षनेतृत्वाकडे देखील नाराजीची कारणे स्पष्ट करण्यात आली होती. मात्र नेतृत्वाकडून कोणताही हस्तक्षेप न करता दुर्लक्ष केले जात असल्याने पदाधिकाऱ्यांनी ऐन निवडणुकीच्या तोंडावर पक्षाला पान २ वर

## निर्मनुष्य गावात १६ तास अडकले मुख्य निवडणूक आयुक्त

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांना एका भयानक प्रसंगाला सामोरं जावं लागलं. बुधवारी रात्री राजीव कुमार यांना घेऊन जाणारं हेलिकॉप्टर खराब हवामानामुळे तात्काळ जमिनीवर उतरवण्यात आलं. पण ज्या ठिकाणी हेलिकॉप्टर उतरलं ते ठिकाणी खुपच भयावह असल्याचं समोर आलं आहे. राजीव कुमार यांचं हेलिकॉप्टर उत्तराखंडमधल्या सुदूरवर्ती गावात उतरवण्यात आलं. निर्मनुष्य असलेल्या या गावातलं वातावरण शून्य डिग्री इतकं होतं. याच परिस्थितीत राजीव कुमार यांना तब्बल १६ तास काढावे लागले. पान २ वर

## परशुराम घाट असुरक्षित



| चिपळूण | प्रतिनिधी |

परतीच्या पावसाने कोकणालाही झोडपले आहे. या पावसात मुंबई-गोवा महामार्गावरील परशुराम घाटात दरड कोसळली आहे. या घटनेमुळे दरडीकडील संरक्षक भिंत व महामार्गालगतची बाजू धोकादायक झाली आहे. त्यामुळे कोकणात जाण्यासाठी महत्त्वाचा मार्ग असलेला परशुराम घाट आता धोकादायक झाला आहे.

गेल्या कित्येक वर्षांपासून मुंबई-गोवा महामार्गाचे काम सुरू आहे. मुंबई-गोवा महामार्गावरील परशुराम घाट हा महत्त्वाचा रस्ता आहे. आधीही विविध कामांसाठी परशुराम घाट बंद ठेवण्यात आला होता. मात्र आता मुसळधार पावसामुळे घाटातील संरक्षक भिंत कोसळली. पान २ वर

## शेख हसीनांच्या अडचणी वाढणार

| ढाका | वृत्तसंस्था |

बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. बांगलादेशमधील न्यायालयाने त्यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी केले आहे. कोर्टाने १८ नोव्हेंबरपर्यंत हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. बांगलादेशच्या आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायाधिकरणाचे मुख्य अभियोक्ता मोहम्मद ताजुल इस्लाम यांनी ही माहिती दिली. बांगलादेशमध्ये शेख हसीना यांच्याविरुद्ध मानवाधिकार उल्लंघनाशी संबंधित अनेक प्रकरणांची चौकशी सुरू आहे. विद्यार्थी आंदोलनात प्राण गमावलेल्या अनेक विद्यार्थ्यांची हत्या केल्याचाही आरोप त्यांच्यावर आहे. या प्रकरणी पान २ वर

**■ अटक वॉरंट जारी; १८ नोव्हेंबरपर्यंत हजर राहण्याचे आदेश**






### अलिबाग-बोरघर गावात सैनिकाचे जल्लोषात स्वागत

# देश रक्षणासाठी सज्ज अग्निवीर 'पार्थ'

| रायगड | प्रतिनिधी |

देशसेवेसाठी सैन्यात भरती झालेल्या तरुणाला भ्रमणध्वनीवरून संपर्क साधण्याचा योग् आला. भ्रमणध्वनीची घंटी वाजली समोरून आवाज आला. हॅलो, माय नेम इज 'पार्थ' असे शब्द कानावर पडले आणि थोडावेळ माय नेम इज बॉण्ड या डायलॉगची आठवण झाली. वाटलं आजची तरुणाई देशसेवेसाठी इतकी वेडी आहे. भारतीय लष्करात अग्निविर बनण्याचे स्वप्न उरात बाळगून सत्यात उतरवणाऱ्या तरुणांमध्ये अलिबाग तालुक्यातील बोरघरच्या पार्थचे नाव इतिहासात कोरले जाणारे आहे. जीवन सार्थकी लावायचे असेल तर देशसेवा हा एकमेव उत्तम पर्याय आहे असे अग्निविर पार्थ सांगतात. आजची तरुणाई संगणकीय युगात फॅशनच्या दिशेने झुकलेली असताना केवळ आणि केवळ मातृभूमीच्या रक्षणासाठी निधड्या छातीने पुढे येणारे तरुणदेखीलआदर्श ठरत आहेत.



कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखां मधून पदवीधर बनण्यापेक्षा



प्रथम देशाचे पैकी बनण्याचा निर्धार करणाऱ्या तरुणांची संख्या वाढताना दिसत आहे. असेचध्येयवेड्या तरुणाने आपले आयुष्य देशसेवेसाठी वेचण्याचा निर्णय घेऊन मित्रांसह गावकऱ्यांना देखील बुचकळ्यात पाडले. शालेय शिक्षण घेतानाचसैन्यात भरती होऊन देश सेवाकरण्याचा निर्धार पक्का करणाऱ्या पार्थ ध्रुव म्हात्रे यांनी आपले सैन्य भरतीसाठी अपेक्षित असणारे शिक्षण कधी पूर्ण होते याची प्रतीक्षा केली होती. बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर बोरघरचेसुपुत्र पार्थ म्हात्रे यांनी सैन्यातील अग्निविर बनण्यासाठी तयारी सुरु केली.

पहिल्या दोन प्रयत्नांमध्ये त्यांना यश आले नाही. अग्निविर बनण्यासाठी प्रयत्न असफल ठरत आहेत. म्हणून पार्थ यांनी नाद सोडला नाही. त्यांनी अधिक चिकाटीने आणि जिद्दीने सैन्यात भरती होण्यासाठीचासराव सुरु ठेवला. तिसऱ्या प्रयत्नामध्ये त्यांनी सांताक्रूझ कलीना येथे झालेल्या भरतीमध्ये अग्निविर बनण्याचे स्वप्नसत्यात उतरवले, २०२३ मध्ये पार्थ म्हात्रे यांची निवड अग्निविर म्हणून झाली. शालेय शिक्षण बोरघर, पान २ वर

# बाळगंगा प्रकल्प रखडला

## तीन हजार कुटुंबांची निराशा



**। पेण । वार्ताहर ।**

तालुक्यातील पूर्व भागाच्या वरसई विभागात बाळगंगा धरण प्रस्थापित करण्यात आले असून धरणाचे काम जवळपास ८० टक्के पूर्ण झाले आहे; मात्र १५ वर्षे पूर्ण होऊनही प्रलंबित मागण्यांकडे सरकारचे दुर्लक्ष होत असल्याने प्रकल्पग्रस्त आक्रमक झाले आहेत. विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून आचारसंहिता लागू होण्यापूर्वी राज्यातील १,३०० प्रश्नांकडे लक्ष घालून भूमिपूजन, लोकार्पण सोहळे आटोपले; परंतु रायगडसह पनवेल, नवी मुंबईकरांची तहान भागवणाऱ्या बाळगंगा धरणबाधित तीन हजार कुटुंबियांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे बाधित प्रकल्पग्रस्तांनी लोकसभेच्या मतदानावर बहिष्कार टाकला होता. आता पुन्हा विधानसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकणार असल्याची चर्चा आहे.

पेण तालुक्यातील वरसई येथे नवी मुंबईला पाणीपुरवठा करण्यासाठी २०१० मध्ये बाळगंगा धरण प्रस्थापित झाले. धरणासाठी तालुक्यातील जावळी, वरसई, करोटी, निधवली, गागोदे आणि वाशिवली या एकूण सहा ग्राम पंचायतींतील नऊ महसुली गावे आणि १३ आदिवासी वाड्यांतील जमीन संपादित करण्यात आल्याने जवळपास तीन हजारांहून अधिक कुटुंबे विस्थापित झाली. यात आदिवासी समाजाची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. सरकारने काही जमीन नुसतीच संपादित केली असली तरी याठिकाणी कोणतेच सरकारी उपक्रम राबवत आलेले नाही.

त्यामुळे धरणग्रस्त कित्येक वर्षांपासून पायाभूत सुविधांपासून वंचित आहेत.१५ वर्षांत कोणत्याच गावाचे पुनर्वसन झालेले नाही. शेतकऱ्यांच्या जमिनीचा मोबदला, पुनर्वसनासाठी भूखंडाचे वाटप, घरांच्या किमती, पुनर्वसन आराखडा हे सर्व प्रश्न आजतागायत सुटलेले नाहीत.

एकीकडे धरणाचे काम ८० टक्के पूर्ण झाले असताना पुनर्वसन मात्र रखडले आहे. कायद्यानुसार आधी नागरिकांचे पुनर्वसन करणे गरजेचे असताना या निर्णयाकडे दुर्लक्ष करून राज्यातील रखडलेल्या तसेच नव्याने होऊ घातलेल्या जवळपास १,३०० निर्णयांना राज्य सरकारने मंजुरी दिली; मात्र बाळगंगा प्रकल्पग्रस्तांच्या तीन हजार कुटुंबांची घोर निराशा केल्याने येणाऱ्या निवडणुकीत प्रकल्पग्रस्त शेतकरी मतदानावर बहिष्कार टाकण्याच्या विचारात आहेत.

# उरणकरांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही


**। उरण । प्रतिनिधी ।**

गेल्या अनेक महिन्यापासून उरण शहरातील सीसीटीव्ही बंद असून येत्या काही दिवसातच उरणकरांच्या सुरक्षेसाठी महत्वाच्या ३४ ठिकाणी शंभर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. त्यामुळे पोलीस यंत्रणेला याचा फायदा होणार आहे. यासाठी उरण नगर परिषदेच्या माध्यमातून ही व्यवस्था करण्यात येणार आहे.

जुलै महिनाभरात उरण-पनवेल या रहदारीच्या मार्गावर झालेल्या हत्याकांडानंतर उरणकरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला होता.

शहर आणि परिसरातील सीसीटीव्ही बंद असल्याचे समोर आल्याने उरणमधील महिला आणि रहिवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला होता.

अटल सेतू आणि रेल्वे सेवेमुळे हे अंतर अवघ्या ३० ते ४० मिनिटांवर आले आहे. त्यातच, उरण तालुक्यातील वाढते व्यवसाय, कंटेनर याड्‌र्स आणि बंदर यामुळे हजारो रहिवासी हे दररोज येजा करीत आहेत.



> उरणच्या शहरातील मोक्याच्या ३४ ठिकाणी शंभर सीसीटीव्ही उरण नगर परिषदेच्या वतीने बसविण्यात येणार आहेत. या कामाची सुरुवात झाली आहे.
> **समीर जाधव, मुख्याधिकारी, उरण नगर परिषद**

> उरण शहरातील बंद सीसीटीव्ही सुरु करून शहरातील हालचालीवर नियंत्रण ठेण्यासाठी कक्ष उभारण्यात येणार असून यासाठी नगरपरिषदकडून अंमलबजावणी करण्यात येणार असून त्याची कार्यवाही सुरु आहे.
> **-जितेंद्र मिसाळ, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,उरण पोलीस ठाणे**

# उमेदवारी अर्ज भरताना शक्तिप्रदर्शनास मनाई

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यामध्ये विधानसभा निवडणुकीचे वातावरण हळूहळू तापू लागले आहे. निवडणुकीसाठी अर्ज दाखल करणे हा एक मोठा सोहळाच असतो; परंतु आता अर्ज दाखल करताना, उमेदवार व कार्यकर्त्यांकडून होणाऱ्या उत्साहाला निवडणूक कार्यालय परिसरात निर्बंध येणार आहेत. त्यामुळे कार्यकर्त्यांच्या आनंदावर विरजण पडले आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात येताना उमेदवारांना शक्तिप्रदर्शन करता येणार नाही. या वेळी वाहनांच्या ताफ्यामध्ये तीनपेक्षा जास्त मोटारगाड्यांचा समावेश नसावा. तसेच, अर्ज दाखल करताना, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा दालनात पाच व्यक्तिंव्यतिरिक्त कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. त्याचबरोबर शक्तिप्रदर्शन करत मिरवणुका काढणे, सभा घेत घोषणा देणे, प्रचाराची गाणी, वाद्य वाजवण्यास प्रतिबंध असल्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी किशन जावळे यांनी दिले आहेत.

उमेदवारी अर्ज मंगळवारपासून (ता. २२) भरता येणार असून शेवटची तारीख मंगळवार (ता. २९) आहे. अनेकदा शेवटच्या दिवशी अर्ज दाखल करण्यासाठी गर्दी होते. यानिमित्त राजकीय पक्षांकडून शक्तिप्रदर्शन केले जाते. यामुळे कायदा सुव्यवस्था ही बिघडत असते. निवडणूक प्रक्रिया शांततेत होण्यासाठी हे सर्व टाळण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी जावळे यांचे स्पष्ट सूचना आहे. विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम १५ ऑक्टोबर रोजी घोषित झाला आहे. निवडणुका घोषित होताच आदर्श आचारसंहिता अमलात आली आहे. त्यानुसार निवडणूक कालावधीत जिल्ह्यात लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टिकोनातून निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करताना कोणत्या नियमांचे पालन करावे, काय करू नये, परिसरात मिरवणुका, सभा घेण्यास प्रतिबंध असल्याचे आदेश लागू केले आहेत.

निवडणुकीच्या वेळी अर्ज दाखल करणारे उमेदवार व कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह असतो. मोठमोठ्या मिरवणुका, असंख्य वाहनांचा ताफा व घोषणाबाजी करत निवडणूक अर्ज दाखल केले जातात; परंतु आता निवडणूक अधिकारी कार्यालय परिसरात एक प्रकारे संचारबंदीच लागू करण्यात आली आहे. निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या तारखेपासून लागू झालेली आदर्श आचारसंहिता २५ नोव्हेंबर पर्यंत लागू करण्यात आली आहे.

# नारी शक्ती चषकात महिला क्रिकेटचा जल्लोष

**। रसायनी । वार्ताहर ।**

मानवी हक्क संरक्षण फेडरेशन आणि केंद्रीय लोकशाही पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या एकदिवसीय बॉक्स क्रिकेट स्पर्धेत सर्व वयोगटातील महिलांनी उत्साहात सहभाग घेतला. १८ ते ५८ या वयोगटातील महिलांनी क्रिकेटचा अनुभव घेतला आणि खेळाच्या या उत्साही मैदानावर आपली उपस्थिती नोंदवली.

स्पर्धेचा उद्‌घाटन सोहळा पोलीस पत्नी रत्नप्रभा गोमासे यांच्या हस्ते करण्यात आला.



विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील क्रिकेट सामना तरुणाईत नवीन ऊर्जा भरून गेला. अनेक सामने अत्यंत प्रतिस्पर्धी पद्धतीने खेळले गेले. या स्पर्धेत काही महिलांनी पहिल्यांदाच क्रिकेट खेळण्याचा अनुभव घेतला.

स्पर्धेत दहा संघांनी सहभाग घेतला. या स्पर्धेतील विजेतापद मैत्री ग्रुप पनवेल यांनी तर उपविजेतापद हरमनी स्पोर्ट्स क्लब यांनी मिळवले. विजेत्या आणि उपविजेत्या संघांना मान्यवरांच्या हस्ते रोख पारितोषिके आणि चषक देऊन गौरवण्यात आले. स्पर्धेत उत्कृष्ट खेळाडू, फलंदाज, गोलंदाज आणि मालिकावीर अशा विविध श्रेणीमध्ये पारितोषिके देण्यात आली.या कार्यक्रमास पनवेल एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन इक्बाल काझी, उद्योजक अस्लम मुंशी, माजी नगरसेवक मुकिद काझी, उद्योगपती नविद पटेल, आशा की किरण फाऊंडेशनचे चेअरमन बशीर कुरेशी, नुरजहा कुरेशी, उद्योजक मुद्दासिर पटेल, रॉयल गार्डनचे मुज्जमिल ठाकूर, उद्योजक जितेंद्र खैरे, तमिम मुल्ला, हमीद शेख, तमिम, खलील तांबोळी, शहबाझ पटेल,राजेश्री कदम आणि क्रिकेट प्रेमी उपस्थित होते. हा कार्यक्रम लाईव्ह ठेवण्यात आला होता. नारी शक्ती चषक २०२४ हा महिलांना क्रिकेटच्या माध्यमातून एकत्र येण्याची आणि आपली क्षमता प्रदर्शित करण्याची एक उत्तम संधी ठरला. हे कार्यक्रम महिला सक्षमीकरणाच्या दिशेने एक महत्वपूर्ण पाऊल आहे. अशा प्रकारच्या स्पर्धा महिलांमध्ये आत्मविश्वास वाढवण्यास आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यास मदत करतात.

# सलमान खानच्या घराबाहेरील टेहळणी प्रकरणातील आरोपीला अटक

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

अभिनेता सलमान खानच्या पनवेल येथील शेतघराबाहेरील टेहळणी प्रकरणातील फरार आरोपीला हरियाणातील पानिपत येथून अटक केल्याची माहिती पोलीसांनी दिली. सुखा असे या संशयीत आरोपीचे नाव असून तो लॉरेन्स बिश्नोई टोळीशी संबंधित आरोपी आहे. पानिपत येथील सेक्टर २९ मधील अनाज मंडी परिसरातील अभिनंदन हॉटेलमध्ये त्याला हरियाणा आणि नवी मुंबई पोलीसांनी पकडले. पोलिसांचे पथक लवकरच सुखाला पनवेल येथील न्यायालयासमोर हजर करणार आहेत.

सुखाने हत्येचे काम नियुक्त नेमबाज अजय कश्यप उर्फ एके आणि कटात सहभागी असलेल्या इतर चार जणांना सोपवले आहे. कश्यप आणि त्याच्या टीमने सलमान खानच्या फार्महाऊसची तपासणी केली, स्टारच्या सुरक्षा उपायांचे बारकाईने मूल्यांकन केले. अभिनेत्याच्या कडक सुरक्षा आणि बुलेटप्रूफ वाहनांमुळे हत्या घडवून आणण्यासाठी अत्याधुनिक, उच्च दर्जाची शस्त्रे आवश्यक असतील असा निष्कर्ष त्यांनी काढला. सुखा याच्याविरोधात पोलिसांना जे पुरावे सापडलेत त्यामध्ये पाकिस्तानामधील बेकायदा शस्त्र विक्रेता डोगर याच्यासोबत सुखा याचे थेट संबंध असल्याचे मोबाईलवरील दूरदृष्यप्रणालीवरील संभाषण पोलिसांच्या हाती लागले आहेत.

सलमानच्या घरावरील टेहळणी आणि शस्त्र्यांच्या देवाणघेवाणीच्या वाटाघाटी करताना सुखा हा डोगर याच्यासोबत दूरदृष्य प्रणालीने संपर्कात होता. यामध्ये एके ४७ आणि इतर आधुनिक शस्त्र शालमध्ये गुंडाळल्या अवस्थेमध्ये डोगर दिसत असल्याचे पुरावे पोलिसांना मिळाले होते. डोगरने पाकिस्तानकडून आवश्यक अत्याधुनिक शस्त्रास्त्रांचा पुरवठा करण्यास सहमती दर्शवली. त्यानंतर हे शस्त्र खरेदी करण्यासाठी सुखा याने ५० टक्के आगाऊ आणि उर्वरित रक्कम शस्त्र भारतात मिळाल्यानंतर देण्याचे मान्य केले होते.

# ज्ञानदेव पवार हाती घेणार तुतारी ?

**। माणगाव । वार्ताहर ।**

नगरपंचायतीचे नगराध्यक्ष ज्ञानदेव मारुती पवार यांनी आपल्या नागराध्यक्ष पदाचा राजीनामा २० सप्टेंबर रोजी दिला होता. ज्ञानदेव पवार हे शिवसेना शिंदे गटाचे नेते म्हणून ओळखले जात होते. विधानसभा निवडणुकीचे लगबग सुरू झाल्यानंतर त्यांनीही शिवसेना शिंदे गटाला अखेरचा जय महाराष्ट्र करण्याचा निर्णय ऐन निवडणुकीत घेतला. ते आज मुंबई येथे १८ ऑक्टोबर शुक्रवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात राष्ट्रीय पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या व पक्ष श्रेष्ठींच्या हस्ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात आपल्या अनेक कार्यकर्ते सहकाऱ्यांसह प्रवेश करून हाती तुतारी घेणार आहेत. त्यामुळे माणगाव सह श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघात राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

ज्ञानदेव पवार हे शिवसेना शिंदे गटाचे मातब्बर नेते म्हणून ओळखले जातात. श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघात त्यांच्या या पक्षप्रवेशाने महायुतीला मोठा हादरा बसणार आहे. त्यामुळे या निवडणुकीत राजकीय गणिते बिघडणार आहेत. पवार हे शिवसेना शिंदे गटातून शरद पवार गटात जाणार असल्याच्या चर्चा गेल्या अनेक दिवस माणगाव तालुक्यात रंगल्या होत्या.

अखेर सायंकाळी उशिरा खुद्द ज्ञानदेव पवार यांनी आपण आपल्या अनेक सहकारी, समर्थकांसह मुंबईत पक्षप्रवेश करणार असल्याचे जाहीर केले. त्यांच्या पक्ष प्रवेशाने श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघात राजकीय समीकरणे बदलणार आहेत.

याकडे आता राजकीय नेत्यांचे लक्ष लागून राहिले आहे. ज्ञानदेव पवार यांच्या शरद पवार गटात पक्ष प्रवेशाने राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला मोठी ताकद मिळणार आहे. माणगाव नगरपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक सन २०२१ मध्ये होऊन ज्ञानदेव पवार हे निवडून आले होते. शिवसेना पक्षाचे ज्ञानदेव पवार यांची अडीच वर्षाकरिता १० फेब्रुवारी २०२२ रोजी माणगाव नगराध्यक्षपदी निवड करण्यात आली होती. त्यानंतर त्यांनी आपल्या नगराध्यक्ष पदाचा राजीनामा दिला होता. त्यांनी शिवसेना (शिंदे गट) पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला होता. आता तुतारी हाती घेण्याचा निर्णय घेऊन चर्चांना पूर्ण विराम दिला आहे.

# नारायण पाटील यांचे निधन

**वाघ्रण :** अलिबाग तालुक्यातील रायंदे- चरी येथील शेकापचे खंदे कार्यकर्ते नारायण रामजी पाटील यांचे ११ ऑक्टोबर २०२४ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८९ वर्षांचे होते. त्यांच्यावर स्थानिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. नारायण पाटील हे कै. नारायण नागू पाटील यांच्या शेतकरी संपातील कार्यकर्ते होते. त्यांना सामाजिक व अध्यात्मिक कार्याची आवड होती. त्यांचे दिवस दशक्रिया विधी २० ऑक्टोबर तर तेरावा २३ ऑक्टोबर रोजी होणार आहेत त्यांच्या मागे तीन मुले, सुना, नातवंडे,पणतु असा मोठा परिवार आहे.



पान १ वरून

## शेतकऱ्यांचा निर्धार, दळवी हद्दपार

देण्याचे लेखी वचन दिले गेले. तथापि, फक्त २५० एकर जागेचा उपयोग प्लांट आणि त्यांच्या निवासी कॉलनीसाठी झाला. मात्र २८० एकर जागा आजही पडून आहे.

२००९-१० मध्ये वेलस्पून मॅक्सस्टील लिमिटेडने विक्रम इस्पात प्रकल्प १ हजार कोटींपेक्षा जास्त मूल्यात खरेदी केला. वेल्सपुनने केवळ विद्यमान ५३० एकरच नाही तर सहा गावांमधील १२६ शेतकऱ्यांकडून अतिरिक्त ४९५ एकर जमीन खरेदी केली. त्यामुळे एकूण अधिग्रहित भूखंड १,०२५ एकर झाला. तीन वर्षात औद्योगिक विस्तार न झाल्यास नुकसान भरपाई देण्याचा वेलस्पूनने शेतकऱ्यांसोबत एक सामंजस्य करार केला होता.

२०१४ मध्ये वेलस्पूनकडून जेएसडब्ल्यू कंपनीने २ हजार कोटींपेक्षा जास्त रक्कमेत प्रकल्प खरेदी केला. पुर्वीप्रमाणेच जेएसडब्ल्यू कंपनीनेही शेतकऱ्यांना रोजगाराचे गाजर दाखविले. गेली १० वर्षे शेतकरी याबाबत पाठपुरावा करीत आहेत. मात्र, आजमितीस ना औद्योगिक विस्तार झाला ना रोजगार, ना नुकसान भरपाई.

मार्च २०२३ मध्ये जेएसडब्ल्यू कंपनीने नोकरीच्या बदल्यात शेतकऱ्यांच्या कुटुंबांना एकरी १६ लाख रुपये देण्याचा प्रस्ताव दिला. मात्र, शेतकऱ्यांनी त्यावर आक्षेप घेतला. यामुळे व्यापक आंदोलन उफाळले. १२ जुलै २०२३ पासून ४० दिवसीय अनिश्चित उपोषण करण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांनी नुकसान भरपाई मागितली. दरम्यान, शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी आणि राज्य सरकारशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांचे प्रयत्न निष्फळ राहिले.

**एक अध्यक्षीय समिती आणि अहवाल**

विरोध वाढत असल्याने, औद्योगिक मंत्री उदय सामंत यांनी शेतकऱ्यांच्या मागण्या आणि तक्रारींचा अभ्यास करण्यासाठी अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्या नेतृत्वाखाली एक अध्यक्षीय समिती स्थापन केली. या समितीने रोजगार, भूमीचा परतावा आणि शेतकऱ्यांना देय भरपाईसंबंधीच्या मुद्द्यांवर ३० दिवसांच्या आत अहवाल सादर करावा, अशी अपेक्षा होती. मात्र, सरकारने कोणतीही कार्यवाही केली नाही.

**आंदोलनाचा निर्णय**

महायुतीच्या उमेदवारांना मतदान न करण्याची घोषणा

सरकारच्या निष्क्रियतेमुळे खोटी आश्वासने आणि शासकीय तसेच कॉर्पोरेट हितसंबंधांच्या संगनमतामुळे निराश झालेल्या मुरुड तालुक्यातील शेतकऱ्यांनी आगामी निवडणुकांमध्ये महायुतीच्या उमेदवारांना मतदान न करण्याचा ठाम निर्णय घेतला आहे. आपल्या हक्कांचे संरक्षण करण्यात सरकार अपयशी ठरले आहे आणि या कारणामुळे शेतकरी सत्ताधारी पक्षाविरुद्ध प्रचार करण्याचा निर्धार व्यक्त करत आहेत.

## माजी आ. भोईर यांना जामीन मंजूर

आहे. त्यांच्या जामिनासाठी ठाकरे गटाची धावपळ सुरु असून त्याबाबतचा अर्ज न्यायालयात दाखल केला असल्याची माहितीही समोर आली आहे. दरम्यान, माजी आमदार मनोहर भोईर यांचे वकील ॲड.योगेश गांगल, ॲड. रत्नदीप पाटील आणि ॲड. धनश्री भोईर यांनी बेलापूर न्यायालयात जामिनासाठी अर्ज दाखल केला असता न्यायालयाने त्यांचा जामीन अर्ज मंजूर केला.

## वाहनाच्या धडकेने दुचाकीस्वाराचा मृत्यू

या अपघातात मधुकर सोंडकर यांच्या मानेच्या डाव्या बाजूला गंभीर दुखापत होऊन त्यामध्ये त्यांचा मृत्यू झाला. अज्ञात वाहनावरील चालक पळून गेला. याबाबत माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या अपघाताच्या गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शाखाली पोलीस उपनिरीक्षक चव्हाण हे करीत आहेत.

## शेख हसीनांच्या अडचणी वाढणार

आता शेख हसीना यांच्या अडचणी आणखी वाढणार असल्याची शक्यता आहे.

बांगलादेशात शेख हसीना यांच्या प्रत्यार्पणाची मागणी अनेकदा करण्यात आली आहे. या प्रकरणी भारतालाही राजनैतिक संकटाचा सामना करावा लागत आहे. शेख हसीना यांच्यामुळे दोन्ही देशांतील संबंधांवरही परिणाम होऊ शकतो, असे मानले जात आहे. भारत आणि बांगलादेश यांच्यात २०१३ मध्ये प्रत्यार्पण करार झाला होता. यामुळे आता बांगलादेशमधील सरकार शेख हसीना यांच्या प्रत्यार्पणाची मागणी करु शकते. भारत आणि बांगलादेश यांच्यातील प्रत्यार्पण करारानुसार, सीमावाद, दहशतवाद आणि राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या गुन्हेगारांना दोन्ही देशांच्या विनंतीनुसार परत पाठवले जाईल, असा त्यावेळी करार झाला होता. शेख हसीना यांच्याविरोधात अनेक गुन्हे दाखल केले आहेत. त्यांच्याविरोधात हत्येचा गुन्हाही दाखल आहे.

या वर्षी जुलै महिन्यात बांगलादेशात आरक्षणाविरोधात विद्यार्थी आंदोलन झाले होते. महिनाभर चाललेल्या या आंदोलनात चारशेहून अधिक जणांना जीव गमवावा लागला. यानंतर संतप्त विद्यार्थ्यांनी मोठं आंदोलन ढाक्याला केले. ५ ऑगस्ट रोजी सुरक्षेच्या कारणास्तव शेख हसीना यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला आणि लष्कराच्या हेलिकॉप्टरने भारतात आल्या. तेव्हापासून शेख हसीना यांनी भारतात आश्रय घेतला आहे. यानंतर बांगलादेशात सत्तांत्तर झाले.

## परशुराम घाट असुरक्षित

त्यामुळे पुन्हा एकदा महामार्गाच्या निकृष्ट कामाचा दर्जा समोर आला आहे. या महामार्गावरची वाहतूक एकेरी लाईनमध्ये सुरू आहे.

दोन ते तीन वर्ष परशुराम घाट हा पूर्णपणे खोदून तयार करण्यात आला होता. मात्र, अद्यापही या महामार्गावर दरड कोसळणे आणि डोंगर खचणे सुरूच आहे. संरक्षक भिंतीचा आणखी एक भाग कोसळला आहे. सिमेंट काँक्रिटच्या रस्त्याखालील मातीची मोठी धूप झाली आहे. त्यामुळं महामार्गाचा काँक्रिटचा रस्ता केव्हाही कोसळण्याचा धोका निर्माण झाला आहे.

महामार्गावरील एक लाईन बंद असली तरी दुसऱ्या लाईनलाही धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. उर्वरित संरक्षक भिंतही कोसळण्याच्या स्थितीत आहे. दरम्यान, परशुराम घाटात संरक्षक भिंत कोसळून दरडीचा भागही पूर्णपणे कोसळला आहे. त्याच ठिकाणी टेलिफोन केबल होती. संरक्षक भिंत कोसळल्याने ती केबलही तुटली आहे.

## निर्मनुष्य गावात १६ तास अडकले मुख्य निवडणूक आयुक्त

कुमार यांच्याबरोबर दोन पायलट, दोन निवडणूक अधिकारी हे देखील होते. या सर्वांना सुदूरवर्ती गावातील एका निर्जन घरात रात्र काढावी लागली.

राजीव कुमार हे पिथौरगढ इथल्या एका मतदान केंद्राची पाहणी दौरा करणार होते. डोंगरावरच्या आणि अडगळीच्या ठिकाणी असलेल्या मतदान केंद्र आणि मतदारांना कोणत्या समस्यांना सामोरं जावं लागतं, याची माहिती निवडणुक आयोगाला घ्यायची होती. यासाठी उत्तरांखडमधल्या १४ गावांतील मतदान केंद्राचा दौरा करण्याची योजना आखण्यात आली होती. पण खराब हवामानामुळे त्यांचं हेलिकॉप्टर रालमजवळ आपत्कालीन परिस्थिती उतरवण्यात आलं. ज्या ठिकाणी हेलिकॉप्टर उतरलं त्या गावाचं नावं सुदूरवर्ती असं होतं. हे गाव उंच डोंगरावर असून इथलं तापमान शून्य डिग्री सेल्सिअस इतकं असतं. गुरुवारी सकाळी राजीव कुमार यांना सुरक्षित रेस्क्यू करण्यात आलं. हवामान चांगल झाल्यानंतर हेलिकॉप्टरनेही उड्डाण घेतलं आणि मुनस्यारी तहसील मुख्यालयाच्या ठिकाणी पोहोचलं.

## पनवेलमध्ये अजितदादा गटात उलथापालथ

रामराम ठोकण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील फुटीनंतर राजकारणात मोठी उलथापालथ झाली. पक्षाच्या विभागणीनंतर शरद पवार व अजित पवार असे दोन गट पडले. रायगडच्या राजकारणतील हुकूमी एक्का म्हणून समजले जाणाऱ्या खासदार सुनील तटकरे यांनी अजित पवारांसोबत जाण्याचा निर्णय घेतल्याने अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांच्यासोबत जाण्याचा निर्णय घेतला. तर जुन्या जाणत्या कार्यकर्त्यांनी शरद पवार यांच्यासोबत ठाम राहणे पसंत केले. मधल्या काळात तत्कालीन पनवेल शहर राष्ट्रवादीचे जिल्ह्याध्यक्ष सतीश पाटील यांनी सुनील तटकरे यांची साथ सोडून शरद पवार यांच्या गटात घरवापसी केली. त्यामुळे रिक्त झालेल्या जिल्ह्याध्यक्षपदी अजितदादा गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी महादेव पाटील यांना पनवेल शहर जिल्ह्याध्यक्षपदाची सूत्रे हाती दिली.

मात्र, या जबाबदारीबद्दल पहिल्या दिवसापासूनच नाराजीची धुसफूस पक्षामध्ये पाहायला मिळत होती. काही ठिकाणी खासगीत तर काही ठिकाणी उघडपणे जिल्हाध्यक्षांविरोधात रोष पाहायला मिळत होता. पक्षात मान सन्मान न देणे, पक्ष बैठीकला न बोलावणे, मित्र पक्षाच्या आमंत्रणाला एकटे जाणे तसेच पक्षासाठी कोणतेही कार्यक्रम न घेणे अशा अनेक तक्रारी पक्षातील जबाबदार पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून बोलून दाखवल्या जाऊ लागल्या. त्यामुळे पक्षांतर्गत वाद चव्हाट्यावर येऊ लागला होता. आता ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर पक्षातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते पक्षाला रामराम ठोकण्याच्या तयारीत आहेत.

## नैना प्रकल्प बाधितांची लोक आयुक्ताकडे धाव

येऊन दादागिरी, अरेरावी तसेच जबरदस्तीने मोजमाप करायला येत असल्याबाबत चर्चा करण्यात आली. लोक आयुक्ताकडे तक्रार दाखल करताना जयेंद्र खुणे यांच्यासोबत नैना प्रकल्प बाधित शेतकरी समितीचे अध्यक्ष वामन शेळके, शेतकरी मित्र बाळाराम फडके, आगरी सेना मुंबादेवी अध्यक्ष निलेश म्हात्रे, चेंबूर विधानसभा संपर्कप्रमुख अंबरनाथ म्हात्रे उपस्थित होते. लवकरच आपल्याला योग्य तो न्याय मिळेल, या प्रतीक्षेत पनवेलमधील २३ गावातील नैना प्रकल्प बाधित शेतकरी आहेत.

## देश रक्षणासाठी सज्ज अग्निवीर 'पार्थ'

माध्यमिक शिक्षण भिलजी बोरघर आणि उच्च माध्यमिक शिक्षण रेवदंडा येथे घेतलेल्या पार्थ यांना सैन्यात जाण्याचे दरवाजे उघडले. त्यांना लगेचच प्रशिक्षणासाठी गोवा येथे पाठविण्यात आले. त्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून आता ते देशाच्या पश्चिम बंगाल सीमेवर कर्तव्यावर तैनात आहेत. प्रशिक्षण आणि पोस्टिंग झाल्यानंतर एका वर्षाने अग्निविर पार्थ म्हात्रे यांनी आपल्या बोरघर गावी प्रस्थान केले. गावात दाखल होताच गावाच्या वेशीवरूनच त्यांची मिरवणूक काढण्यात आली. बोरघर गावाच्या एसटी स्थानकावर त्यांची आई संध्या, वडील ध्रुव, बहीण, आजी-आजोबा यांनी त्यांची ओवाळणी केली. यावेळी गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



● मुरूड तालुक्यात कधी ऊन तर कधी पाऊस असे वातावरण असताना संध्याकाळच्या सुमारास समुद्रकिनारी आभाळात वेगवेगळ्या रंगाच्या छटांची उधळना पाहायला मिळाली. (छायाचित्र :- सुधीर नाझरे)

# आचारसंहिता लागताच नाराजीचे सीमोल्लंघन

**। उरण । वार्ताहर ।**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांकडून उमेदवारांची चाचपणी व मोर्चेबांधणी सुरू करण्यात आली आहे. प्रमुख राजकीय पक्ष विद्यमान आमदारांना पुन्हा संधी देण्याची शक्यता आहे. मात्र, तरीही इच्छुकांची गर्दीही वाढू लागली आहे. यातूनच आपण केलेल्या कामांचे दाखले इच्छुक बॅनरबाजीतून देत आहेत.

तालुक्यात समाज माध्यमांमधून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे. अशावेळी स्वपक्षात संधी न मिळाल्यास प्लान बी म्हणून समविचारी व इतर पक्षात सीमोल्लंघन करण्याची तयारी पूर्ण झाली आहे. यामुळे येत्या काळात फोडाफोडीच्या राजकारणाला अधिक बळ मिळणार आहे. लोकसभा निवडणुकीत महायुतीला राज्यात अपेक्षित यश आले नाही. आगामी विधानसभा निवडणुकीत कोणतीही चूक होऊ नये यासाठी राजकीय पक्षांकडून नियोजन सुरू केले आहे. लोकसभेप्रमाणे विधानसभेतदेखील महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असाच सामना रंगणार आहे. असे असले तरी यंदाच्या निवडणुकीत आपल्याला संधी मिळावी यासाठी इच्छुकांनी आपल्या पक्ष नेतृत्वाकडे साकडे घालण्यास सुरुवात केली आहे. जर, विद्यमान आमदारांना डावलून दुसऱ्या उमेदवाराला संधी दिल्यास बंडाचे निशाण उगारण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. यामुळे विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यानंतर संधी न मिळालेले इच्छुक सीमोल्लंघन करण्याची शक्याता आहे.

# नवी मुंबई विमानतळाचे नामकरण गुलदस्त्यात

**। उरण । वार्ताहर ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे दिवंगत नेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्याचा ठराव ठाकरे सरकारने पारित केला होता. यापाठोपाठ महायुती सरकारनेदेखील दि.बां.च्या नावाने ठराव नव्याने पारित केला होता. मात्र, या घडामोडीला दोन वर्षाचा कालावधी उलटूनही यावर अंतिम निर्णय झालेला नाही. यामुळे नवी मुबंई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नामकरण कधी होईल असा सवाल जनता करीत आहे. यातच विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागल्यामुळे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नामकरणाचे वादळ घोंगावत रहाणार आहे.

विमानतळाला हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्याचा ठराव सिडकोने पारित केल्यानंतर नामकरणाच्या वादाला सुरुवात झाली होती. यादरम्यान शिवसेना विरुद्ध प्रकल्पग्रस्त असा काही काळ संघर्षदेखील झाला. मात्र, शेवटी ठाकरे सरकारनेदेखील दि.बां.च्या नावावर ठराव करून या वादावर पडदा टाकला.

यानंतर मुख्यमंत्री शिंदे यांच्या सरकारने ठाकरे सरकारने घेतलेला नामकरणाचा ठराव रद्द करून तो पुन्हा नव्याने पारीत केला होता. त्याला जवळपास २ वर्षांचा अवधी उलटूनही नामकरणाचे घोंगडे आजतागायत भिजत पडले आहे. यावरून नवी मुबंई आंतरराष्ट्रीय विमानतळास कोणाचे नाव मिळणार, हे सध्या तरी गुलदस्त्यात आहे. विधानसभा निवडणुकीनंतर नामकरण कोणाच्या नावे होते याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

# उद्योजकांच्या जखमेवर मीठ चोळू नये

## पृथ्वीराज चव्हाण यांची सरकारवर टीका

## पनवेलमध्ये घेतली उद्योजकांची भेट

**। पनवेल । वार्ताहर ।**

राज्यात महायुती सरकारने उद्योजकांसाठी रेड कार्पेट अंथरले असून मोठी गुंतवणूक होत असल्याचा दावा मुख्यमंत्री शिंदे यांनी बुधवारी (दि.१६) महायुतीच्या पत्रकार परिषदेत केला होता. मात्र, हा दावा माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी खोडून काढला असून, 'मी आताच पनवेलच्या सहकारी औद्योगिक वसाहतीत रेड कार्पेटवरून आलो', असा खोचक टोला लगावला आहे. महाराष्ट्रात एकही मोठा उद्योग आतापर्यंत आलेला नाही. यामुळे सरकारने उद्योजकांच्या जखमेवर मीठ चोळू नये. आणि उद्योजकांना



रेड कार्पेट नाही तर साधे कार्पेट तरी अंथरा, अशी टीका पृथ्वीराज चव्हाण यांनी यावेळी केली आहे.

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी पूर्वनियोजित दौऱ्यादरम्यान पनवेलमधील सहकारी औद्योगिक वसाहतीत उद्योजकांची भेट घेऊन त्यांच्या विविध समस्यांबाबत चर्चा केली. याठिकाणी सन १९६० सालापासून ९२ कंपन्या खडतर परिस्थितीवर मात करून काम करत असूनही पायाभूत सुविधांची वानवा आहे. येथे कर्मचाऱ्यांना राहायला घरे नाहीत, ड्रेनेजची सुविधा नाही, रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट असल्याचे दिसून येते. यामुळे एमआयडीसी, महापालिका व विद्यमान सरकारचे उद्योग खाते देखील अशा सहकारी औद्योगिक वसाहतींना सापतन्य वागणूक देत असल्याचा आरोप पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे.

ते पुढे म्हणाले की, आजच्या घडीला राज्यात २०० सहकारी व खाजगी औद्योगिक वसाहती आहेत. यामुळे येथील पायाभूत सुविधांच्या विकासाची जबाबदारी एमआयडीसीने घेतली पाहिजे. यापूर्वी महाराष्ट्र राज्य उद्योग क्षेत्रात प्रथम क्रमांकावर होते. मात्र, आज दरडोई उत्पन्नाच्या आकडेवारीत अकराव्या क्रमांकावर आहे याचे उत्तर मुख्यमंत्री व उद्योगमंत्र्यांनी द्यावे. गुजरात, हरियाणा आणि दक्षिणेकडील राज्य महाराष्ट्राच्या पुढे गेले आहेत. यामुळे हा विद्यमान सरकारचा नाकर्तेपणा असल्याचा आरोपही पृथ्वीराज चव्हाण यांनी केला.

यावेळी माजी आमदार बाळाराम पाटील, माजी नागराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, पनवेल काँग्रेस जिल्हाध्यक्ष सुदाम पाटील, पनवेल औद्योगिक वसाहतीचे चेअरमन विजय लोखंडे, संचालक अरुण पटेल, दीप लोखंडे, प्रशांत पोतदार, गौरव जोशी, सुनील जेठीया, सुजय सुरतकल, उद्योजक स्वरणपालसिंग कोहली, समाजवादीचे जिल्हाध्यक्ष अनिल नाईक, अमित लोखंडे, राकेश जाधव यांच्यासह उद्योजक उपस्थित होते.

### भाजपाच्या विरोधातील लढाई सुरूच

**आम्हाला ४००पार जागा द्या, ही घोषणा संसदेत नरेंद्र मोदी यांनी केली. मोदींच्या खासदाराने आम्हाला दोन तृतीयांश बहुमत द्या, कारण आम्हाला संविधान बदलायचे आहे. मग फेक नरेटिव्ह कोणी पसरवले? संविधान बदलण्याच्या पाच घोषणा भाजपने केल्या. यामुळे लोकांच्या मनात भीती निर्माण झाली, म्हणूनच लोकसभेला जनतेने भाजपला धडा शिकवला. आता भाजपचे हात दगडाखाली आहेत. यामुळे या विरोधातील आमची ही लढाई सुरूच राहणार असल्याचे पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितले.**

# आरोग्य केंद्र उपचाराच्या प्रतीक्षेत



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्रातील ग्रामीण आरोग्य व्यवस्था कोलमडून पडली आहे. गुरुवारी अनेक रुग्णांना उपचारासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या प्रतीक्षेत राहावे लागल्याने येथील रुग्णांनी संताप व्यक्त केला आहे. यामुळे नागरिकांनी आरोग्य व्यवस्थेच्या गलथान कारभाराबाबत नाराजी व्यक्त केली आहे. बऱ्याच वेळा या प्राथमिक आरोग्य केंद्रात श्वान दंशाचे इंजेक्शन, विंचू व सर्पदंशावरील औषधे उपलब्ध नसल्याच्याही तक्रारी लोकांकडून होत आहेत.

उरण पूर्व ग्रामीण विभागात आदिवासी आणि शेतकरी नागरिकांची वस्ती मोठ्या प्रमाणावर आहे. यामुळे येथील नागरिकांचा निसर्गाशी संबंध येत असल्यामुळे त्यांना सरपटणाऱ्या प्राण्यांपासून धोका असतो. अशा रुग्णांवर वेळेत उपचार व्हावेत, यासाठी अशा प्रकारची औषधे या रुग्णालयात उपलब्ध व्हावीत, तसेच यावर उपचार करणारे वैद्यकीय अधिकाऱ्यांचीही नेमणूक येथे करावी. जेणेकरून जीवावर बेतणाऱ्या या रुग्णांना उपचारासाठी लांबचा पल्ला गाठावा लागणार नाही. मात्र, संबंधित शासन याकडे दुर्लक्ष करीत आहे. यामुळे या आरोग्य केंद्रालाच उपाचाराची गरज असल्याची चर्चा होत आहे.

# टक्केवारी वाढविण्यासाठी सर्वस्वी प्रयत्न

**। पेण । प्रतिनिधी ।**

२० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या निवडणूकीच्या अनुषंगाने १९१ पेण विधानसभा मतदार संघाचे निवडणूक अधिकारी तथा प्रांताधिकारी प्रविण पवार यांनी आपल्या दालनात पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. यावेळी त्यांनी सांगितले की, पेणमध्ये लोकसभेला ३७५ बुथ होते. मात्र, त्यांची संख्या ५ ने वाढवून ती ३८० झाली आहे. यामध्ये पेण शहरात गुरूकुल शाळा येथे ४ तर रोहा तालुक्यातील खरबाची वाडी येथे १ असे पाच मतदार बुथ वाढले असून पेण तालुक्यात २१२, रोहा तालुक्यात ८८, तर सुधागड तालुक्यात ८० मतदार केंद्र आहेत. १९१ पेण विधानसभा मतदार संघात ३ लाख ६ हजार ६० मतदार आहेत. यासाठी २००० कर्मचाऱ्यांची सोय करून ठेवली आहे. शासनाकडून पुर्ण तयारी झाली असून मतदाराची टक्केवारी वाढविण्यासाठी वेगवेगळया मार्गांचे अवलंब करून मतदान जनजागृतीसाठी एक कार्यक्रम आखला आहे. जेणेकरून मतदान जास्तीत जास्त संख्येने होईल आणि पेण विधानसभा मतदार संघाच्या मतदानाची टक्केवारी वाढेल.

# आदिवासींचा पेण येथील प्रांत कार्यालयावर मोर्चा

**। उरण । वार्ताहर ।**

आदिवासींच्या विकास निधीचा गैरवापर करणाऱ्या राजिप बांधकाम उपविभाग पेण यांच्यावर दंडात्मक कारवाई करून आदिवासी वाड्यांचे रस्ते बनविणे, गावठाण मंजूर करून घरकुल योजना राबविणे, आदिवासी वाडीला लागून असलेल्या बेकायदेशीर दगड खाणी बंद करणे यासह इतर मागण्यांसाठी ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेच्यावतीने बुधवारी (दि.१६) पेण येथील उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय



दंडाधिकारी यांच्या कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून निघाल्यानंतर पेण नगरपरिषदेजवळ मोर्चा पोलिसांनी अडवून मोर्चेकऱ्यांचे शिष्टमंडळ प्रांत कार्यालयात बैठकीसाठी घेऊन गेले. या बैठकीत पेण प्रांत प्रवीण पवार, पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी लता मोहिते, प्रवीण पाटकर, उपअभियंता रवी पाचपोर, तहसीलदार सचिन शेजाळ व संतोष ठाकूर, मानसी पाटील, किशोर पाटील, सुनिल वाघमारे, जितेंद्र वाघमारे आदी उपस्थित होते.

या बैठकीत शिष्टमंडळाने केलेल्या मागण्यांनुसार उंबरमाल, खवसावाडी येथील आदिवासी वाड्यांच्या रस्त्यांच्या विकास निधीमध्ये झालेल्या गैर वापराची चौकशी करण्यात येईल. तसेच, तांबडी येथील सभागृह, खैरासवाडी, वडमाल वाडी, माळवाडी, काजूवाडी या वाड्यांच्या रस्ते, उंबरमाळ येथील शाळा इमारत दुरुस्तीचे प्रस्ताव तत्काळ मंजूर करण्यात येतील, असे गटविकास अधिकारी लता मोहिते यांनी सांगितले. तर, तहसीलदार सचिन शेजाळ यांनी आदिवासींच्या प्रलंबित जातीच्या दाखल्यांचे अर्ज लवकरात लवकर निकाली काढण्यात येतील. तसेच, खैरासवाडी शेजारी असलेल्या दगड खाणीबाबत होत असलेल्या समस्यांसाठी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना दोन दिवसात प्रत्यक्ष पाहणी करण्यास पाठविले जाईल, असे सांगण्यात आले.

## 'आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके'

# नागोठणे आयटीआयचे नामकरण

। नागोठणे । वार्ताहर ।

शासन निर्णयानुसार राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना थोर समाजसुधारक किंवा मान्यवर व्यक्तींचे नाव देण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच, राज्यातील आयटीआय संस्थांचे नाव बदलण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने मंजूर केला होता. यानुसार नागोठणे आयटीआयचे सोमवारी (दि.१४) 'आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके शासकीय



औद्योगिक प्रशिक्षण संस्था' असे नामकरण करण्यात आले आहे.

नागोठणे आयटीआय संस्थेचा हा नामकरण सोहळा प्राचार्या विद्या पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व सरपंच सुप्रिया महाडिक यांच्या हस्ते पार पडला. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते. संस्थेचे गटनिर्देशक, शिल्पनिर्देशक आणि संस्थेतील कर्मचारी यांच्या मेहनतीने हा नामकरण सोहळ्याचा कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.

विद्यार्थ्यांमध्येव्यवसायाभिमुख कौशल्ये विकसित करण्यात मोलाची भूमिका बजावणाऱ्या राज्यातील १४ सरकारी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे म्हणजेच आयटीआयचे नामकरण करण्याची घोषणा कौशल्यविकास व उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केली होती. राज्यातील सरकारी आयटीआय संस्थांपैकी फक्त दोनच संस्थांची ओळख नावांद्वारे होती. उर्वरीत संस्था त्या-त्या शहराच्या किंवा गावाच्या नावाने ओळखल्या जात होत्या. उर्वरित आयटीआय संस्थांचे नामकरण करण्याबाबतच्या नागरिकांच्या सूचनांची दखल घेण्यात येईल, असेही लोढा म्हणाले होते. त्याचाच एक भाग म्हणून नागोठणे आयटीआयचे नामकरण करण्यात आले आहे.

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची डोळेझाक

# उरण तालुका प्रदूषणाच्या विळख्यात

**। उरण । वार्ताहर ।**

उरण तालुक्यात वाढते औद्योगिककरण लोकांची डोकेदुखी ठरत आहे. या वाढत्या उद्योगांमुळे रोजगाराची जरी संधी उपलब्ध होत असली, तरी अनेक आजारांना हे आमंत्रण ठरत असल्याची तक्रार आता नागरिक करू लागेल आहेत. मात्र, या तक्रारींकडे प्रदूषण नियंत्रण मंडळ सोयीस्करपणे डोळेझाक करत असल्याचा आरोप येथील नागरिक करत आहेत.

तालुक्यातील वाढते औद्योगिकीकरण आणि तेल, रासायनिक कंपन्यांमुळे उरण परिसराला प्रदूषणाचा विळखा बसला आहे. या वाढत्या प्रदूषणाकडे महाराष्ट्र प्रदूषण मंडळही जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याने परिसरातील हजारो नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. मागील ४० वर्षांपासून उरण परिसरात औद्योगिकीकरणाला सुरुवात झाली. जेएनपीटी, ओएनजीसी, नौदलाचे शस्त्रागार, वायू विद्युत केंद्र, बीपीसीएल या केंद्रराज्य शासनाच्या अखत्यारित असलेल्या विविध प्रकल्पांवर आधारित अनेक छोट्या-मोठ्या कंपन्या उभारण्यात आल्या आहेत.

जेएनपीटी परिसरात क्षेत्रात मोठमोठे रासायनिक प्रकल्प



उभारण्यात आले आहेत, तर आणखी उभारले जात आहेत. मात्र, बंदरातील जहाज वाहतूक, तेल आणि रासायनिक कंपन्यांमुळे परिसरात जल, वायुप्रदूषण वाढले आहे. इतर बंदर उभारणीचे काम सुरू आहे. तसेच, जहाजातून केरकचरा, वापरून झालेले काळे तेल चोरीछुपे समुद्रात सोडले जाते यामुळे समुद्रात जलप्रदूषण होत आहे. रसायनमिश्रित दूषित सांडपाणी नाल्यातून समुद्र, खाड्यांत मिसळत असल्यानेही जलप्रदूषणात मोठी वाढ झाली आहे.

जेएनपीटी बंदरात रसायने हाताळताना त्याचा उग्र वासाचा त्रास ग्रामस्थांना आणि कामगारांना होत असतो. वाढत्या औद्योगिकरणामुळे वाहनांची वर्दळ रस्त्यावर वाढल्याने रस्त्यात मोठमोठाले खड्डे झाले आहेत. अवजड कंटेनर या खड्ड्यात आपटत असल्याने त्याचा जोरदार आवाज होऊन नागरिकांची झोपमोड होत असल्याच्याही तक्रारी आहेत. धुलीकण मोठ्या प्रमाणात हवेत उडून नागरिकांना श्वसनाचे आजार जडले आहेत. रासायनिक पदार्थांच्या उग्र वासामुळे प्रदूषणात भरमसाठ वाढ झाली असून प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडून कुठलीच कारवाई अथवा उपाययोजना होताना दिसत नाहीत.

यावर आताच ठोस उपाययोजना केली नाहीतर पुढची तरुण पिढीची अवस्था तरुणपणातच बिकट होऊन त्यांना गंभीर आजारांचा सामना करावा लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याला सर्वस्वी शासनाबरोबर राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, सामाजिक पदाधिकारी व प्रदूषण मंडळच जबाबदार असेल, असा आरोप उरणची स्थानिक जनता करीत आहे.

# कामोठ्यात महिलांचा सन्मान

**। पनवेल। वार्ताहर ।**

शेकाप कार्याध्यक्ष गौरवभाई पोरवाल यांच्या संकल्पनेतून आणि मा. आमदार बाळाराम पाटील यांच्या सहकार्याने नारी सन्मान म्हणून वेगवेगळ्या क्षेत्रातील महिलांना 'नवदुर्ग पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. या उपक्रमाचे कामोठे वसाहतीसह इतर ठिकाणी कौतुक होत आहे.

यावेळी पहिला नवदुर्गाचा मान महिला अधिकारी आणि पोलीस कर्मचारी यांना दिला. दुसरा मान शिक्षक वर्ग म्हणजे जो आपल्याला आपल्याला समाजात कसे राहायचे, कसे वागायचे, कसे बोलायचे या सर्व गोष्टी शिकतात. तिसरा नवदुर्गाचा मान गृहिणींना देण्यात आला. चौथा आणि पाचवा मान दाताच्या डॉक्टरांना देण्यात आला. यानंतर सहावा, सातवा आणि आठवा मान सोसायटीमधल्या ज्या महिला बचत गट चालवतात, त्या महिला थोडेथोडे पैसे बचत करून ते पैसे गरजू लोकांना देत असतात. यासाठी महिला बचत गटाचा मोठा वाटा आहे. तसेच, शेवटचा नवदुर्गाचा मान हा साफसफाई महिला कर्मचाऱ्यांना देण्यात आला.

या नवदुर्गाच्या कार्यक्रमाला शेतकरी कामगार पक्षाचे कार्याध्यक्ष गौरव पोरवाल, अल्पेश माने, सचिन झणझणे, नितीन पगारे, रामचंद्र आवटी आणि आदर्श मित्र मंडळातील सर्व आजी माझी पदाधिकारी उपस्थित होते.

# दिवसाढवळ्या खून

महायुतीचे सरकार हे काम करणारे सरकार, हे खरेच आहे. पण ती कामे अनैतिक आणि निव्वळ राजकीय फायद्याची असतात हेही त्याहूनही अधिक खरे आहे. मंगळवारी विधानसभा निवडणुकांची आचारसंहिता लागू होणार याची सर्वांना कल्पना होती. म्हणून तर सोमवारी अगदी शेवटच्या क्षणापर्यंत मंत्रिमंडळाच्या बैठका घेऊन निर्णयांचा पाऊस पाडण्यात आला. त्याच रीतीने मंगळवारी अत्यंत घाईघाईने विधानपरिषदेच्या सात सदस्यांचा शपथविधी उरकण्यात आला. राज्यपालांतर्फे नियुक्त करण्यात यावयाच्या बारापैकीचे हे सात सदस्य होत. त्यांची यादी सोमवारी राज्यपालांकडे पाठवण्यात आली व लगेचच हा सोहळा आयोजित करण्यात आला. उद्धव ठाकरे यांच्या महाविकास आघाडीला याच बारा सदस्यांच्या नियुक्तीवरून तत्कालीन राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी अडवले होते. जवळपास एक वर्ष हा प्रस्ताव त्यांच्याकडे पडून राहिला. शेवटी त्यावर काहीही निर्णय होण्यापूर्वी सरकार पडले. दुसरीकडे सध्याच्या राज्यपालांनी सरकारची शिफारस झाल्यापासून बारा तासाच्या आत मंजुरी देऊन त्यांचा शपथविधी झालादेखील. शिंदे सरकारने लोकशाही परंपरा, मानमर्यादांचा हा दिवसाढवळ्या केलेला खून आहे. बाकीच्या सन्माननीय यंत्रणा त्याला सामील व्हाव्यात हे दुर्दैवी आहे. ठाकरे यांनी पाठवलेल्या प्रत्येक प्रस्तावाला राज्यपाल कोश्यारी अडवत असत. राज्यपालाला सरकारी निर्णयांवर शंका विचारण्याची वा आक्षेप घेण्याची मुभा आहे. मात्र एकदा त्याचे उत्तर आले की सहसा राज्यपालांना तो प्रस्ताव अडवून ठेवता येत नाही. कोश्यारी यांनी यात सदैव राजकारण केले. राज्यपालनियुक्त असे वर्णन असले तरी या आमदारांची यादी राज्य सरकार सादर करते व राज्यपाल त्याला मान्यता देतात असाच संकेत आहे. मात्र कोश्यारी यांनी आधी त्यातील काही नावांना आक्षेप घेतला. त्यानंतर ती बदलून पाठवण्यात आल्यानंतर त्यावर काहीही निर्णय न करता ते बसून राहिले. त्यामुळे हे प्रकरण एकदा न्यायालयातही गेले. मात्र राज्यपाल हे घटनात्मक पद असल्याने त्यांना न्यायालय आदेश देऊ शकत नाही असा निर्णय आला. अर्थात, राज्यपालांनी वाजवी वेळ घेऊन निर्णय घ्यावा अशी अपेक्षा तेथेही व्यक्त झालीच.

### कोश्यारींचा धुमाकूळ

पण कोश्यारी मूळचे ज्या भाजपचे होते त्याला लोकशाहीचे मूल्य व संकेत यांची कसलीही पर्वा नाही हे वेळोवेळी दिसलेले आहे. मोदींनी नेमलेल्या सर्व राज्यपालांनी असाच धुमाकूळ घातला आहे. याबाबत केरळ, तमिळनाडू या राज्यातील राज्यपालांना न्यायालयाला इशारे द्यावे लागले. कोश्यारींच्या आडून मोदी सरकारने उद्धव ठाकरे यांची नाकेबंदी करण्याची एकही संधी सोडली नव्हती. राज्यपालनियुक्त प्रकरण हा त्यातलाच एक मोठा अध्याय. नंतर याच कोश्यारींनी शिवसेना फुटीनंतर बेकायदा निर्णय घेतले. दुर्दैव हे की, ते बेकायदा आहेत हे सर्वोच्च न्यायालयाने मान्य केले. मात्र शिंदे सरकार बरखास्त केले नाही. त्या शिंदे सरकारकडून लोकशाही रक्षणाची अपेक्षा करणे चूकच आहे. या सरकारने सत्तेत आल्या आल्या राज्यपालांकडून आधीची यादी मागे घेतली. वास्तविक एकदा सादर केलेली यादी सरकार बदलले म्हणून मागे घेता येत नाही अशी तरतूद आहे. पण ती धाब्यावर बसवण्यात आली. त्यानंतरही या यादीबाबत सरकारने अगदी शेवटच्या घटकेपर्यंत काहीही निर्णय घेतला नाही. शेवटी आचारसंहिता लागू व्हायची वेळ आली तेव्हा घाईघाईने तो घेतला. त्यातही राजकीय सोय बघून आपापल्या लोकांची वर्णी लावण्यात आली. बारा सदस्यपदे भरायची असताना पाच आमदारक्या अजूनही रिकाम्या ठेवण्यात आल्या. सध्या जागा व तिकिटवाटपांचा हंगाम सुरू आहे. अनेक जण नाराज होत आहेत. त्यांना गाजर दाखवण्यासाठी या पाच जागांचा उपयोग होणार आहे. ज्या सात जणांची नियुक्ती झाली आहे ते सर्व राजकीय उपगोगाच्या हिशेबानेच नेमले गेले आहेत. शिंदे गटाने हेमंत पाटील यांचे खासदारकीची उमेदवारी जाहीर करून मागे घेतली होती. त्यांचे पुनर्वसन केले गेले आहे. गंमत म्हणजे आता राज्यपालांना यात आक्षेपार्ह काही वाटलेले नाही. वास्तविक या नियुक्त्यांमध्ये कलाकार, खेळाडू इत्यादींचा समावेश असावा अशी अपेक्षा असते.

### न्यायालयाकडून निराशा

या प्रकरणात पूर्वीच्या नियुक्त्यांबाबत मुंबई उच्च न्यायालयात एक याचिका प्रलंबित आहे. पूर्वीच्या नियुक्त्यांचे काय झाले याचा खुलासा तिच्यात मागवलेला होता. तिच्यावर सुनावणी होऊन न्यायालयाने निर्णय राखून ठेवलेला आहे. अशा स्थितीत हे सर्व प्रकरण न्यायप्रविष्ट मानले जायला हवे होते. नव्या नियुक्त्यांच्या बातम्या येताच याबाबत न्यायालयाकडे तातडीने स्थगिती देण्यासाठी काही जणांनी धाव घेतली. न्यायालयाने ती मान्य करणे अपेक्षित होते. कारण आधीच्या प्रकरणाचा निकाल लागलेला नसताना नव्या नियुक्त्या होऊ शकत नाही अशी भूमिका घेतली जायला हवी होती. पण इथेही न्यायालयाने पुन्हा शिवसेना फुटीच्या वेळसारखाच मार्ग पत्करला. शिंदे सरकारला सोईचा असा अर्थ लागला आणि नियुक्त्यांना परवानगी दिली गेली. या संदर्भात नियम वा कायदे काहीही असले तरी लोकशाही संकेतांचा विचार करून सरकारने या नियुक्त्या करू नयेत असे न्यायालयाने सुचवायला हवे होते. ते झाले नाही. दुसरीकडे निवडणूक आयोगाने आचारसंहितेच्या दिवशी झालेल्या या नियुक्त्यांबाबत सरकारचा कान पकडायला हवा होता. पण तेही नियमावर बोट ठेवून सरकारला सोईचे निर्णय घेत असतात. त्यामुळे या सर्व नियम विरोधकांसाठी असून सर्व यंत्रणा केवळ विरोधकांना अडवण्यासाठीच आहेत की काय असा प्रश्न निर्माण होतो. मागे शिवसेना आमदार फ ुटीबाबत त्यांच्यासमोर सुनावणी चालू असतानाच विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर मुख्यमंत्र्यांना जाऊन भेटले होते. शिवाय आपण आपल्या मतदारसंघातील कामांसाठी भेटलो असा दावा त्यांनी केला होता. आता उद्या समजा मुंबई उच्च न्यायालयाने सरकारला आधीच्या यादीनुसार विधानपरिषद नियुक्त्या करायला सांगितल्या तर या नव्या सदस्यांना घरी जावे लागेल. पण महायुतीच्या नेत्यांना त्याची पर्वा नसेल. ते त्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देऊन वेळ काढतील. शिवाय, नव्या नियुक्त्या रद्द झाल्याच तरी महायुतीच्या नेत्यांचा राजकीय स्वार्थ साधला गेलेला असेल. निवडणूक होऊन गेलेली असेल.

विचार

# ऑटो सेक्टरमध्ये फाईट, रिअल इस्टेट टाईट

***सरत्या आठवड्यात अर्थनगरीमध्ये काही बातम्या लक्षवेधी ठरल्या. त्यापैकी डिझेल वाहने लवकरच बंद होणार असल्याची बातमी महत्वाची ठरली. केंद्र सरकार निव्वळ करातून मालामाल झाल्याची माहितीही समोर आली. दरम्यान, चुकीच्या खात्यात पैसे हस्तांतरणाला आळा घालणारे तंत्रज्ञान बँका वापरणार असल्याची बातमी दिलासादायक ठरली. तर सणासुदीच्या काळात विकसक सवलती, ऑफर्स देत नसल्याचे समोर आले.***



महेश देशपांडे

सरत्या आठवड्यात अर्थनगरीमध्ये छोट्या छोट्या पण महत्वाच्या बातम्या लक्ष वेधणाऱ्या ठरल्या. त्यापैकी डिझेल वाहने लवकरच बंद होणार असल्याची बातमी पुन्हा एकदा चमकून गेली. अन्य एका आकडेवारीमधून केंद्र सरकार निव्वळ करातून मालामाल झाल्याची माहिती समोर आली. दरम्यान, चुकीच्या खात्यात पैसे हस्तांतरणाला आळा घालणारे तंत्रज्ञान बँका वापरणार असल्याची बातमी दिलासादायक ठरली. आणखी एक खास बात म्हणजे सणासुदीच्या काळात यंदा घर विकत घेणाऱ्यांना मोठ्या सवलती, ऑफर्स मिळताना दिसत नाहीत, हे वास्तव समोर आले.

भारतात माल आणि प्रवाशी वाहतुकीसाठी डिझेल वाहनांचा मोठा वापर करण्यात येतो. जगभरात 'ग्लोबल वार्मिंग'ची समस्या वाढत आहे. त्यावर प्रत्येक देश सध्या गांभीर्याने विचार करत आहे. देशातही मोदी सरकारने अनेक उपाय योजना केल्या आहेत. डिझेल वाहनांमुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण वाढत असल्याचा दावा करण्यात येतो. त्यामुळे सरकारच्या खास समितीने डिझेल वाहनांवर बंदी घालण्याची शिफारस केली आहे. तरुण कपूर यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने ऊर्जा संक्रमण सल्लागार समितीची स्थापना केली होती. या समितीने अभ्यासाअंती एक अहवाल सादर केला आहे. त्यानुसार, भारतात २०२७ पर्यंत डिझेल वाहनांवर बंदी आणण्याची सूचना केली आहे. केंद्र सरकारने हरित आणि स्वच्छ ऊर्जेवर लक्ष केंद्रित करण्याची शिफारससुद्धा समितीने केली आहे. सीएनजी आणि इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला प्रोत्साहन देण्याची शिफारस समितीने केली आहे. अर्थात केंद्र सरकारने अद्याप या शिफारसी स्वीकारल्या नाहीत आणि अधिकृतपणे त्यावर काही भाष्य केलेले नाही.

केंद्रीय रस्ते आणि वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी यापूर्वी पेट्रोल आणि डिझेल कार पूर्णपणे बंद करण्याची इच्छा व्यक्त केली होती; पण सरकारने या बजेटमध्ये पेट्रोल अथवा डिझेल कारवर कर वाढवलेला नाही. सरकार पेट्रोल आणि डिझेल कार बंद करण्यावर विचार करत आहे; पण त्यासाठी अगोदर पर्याय उपलब्ध करण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यासाठी इलेक्ट्रिक, सीएनजी, हायड्रोजन, इथेनॉलच्या माध्यमातून धावणाऱ्या वाहनांच्या स्वस्त निर्मितीवर भर देण्यात येत आहे. एका कारचे आयुष्य सुमारे १०-१५ वर्षांचे असते. अधिकृत आयुर्मर्यादा संपल्यानंतर या कार स्क्रॅप पॉलिसीमध्ये मोडतात. गेल्या दोन वर्षांमध्ये सरकारने इलेक्ट्रिक वाहननिर्मितीला 'फेम'अंतर्गत प्रोत्साहन दिले आहे, सबसिडी दिली आहे. आता दुचाकीसोबतच चारचाकी इलेक्ट्रिक वाहनांची निर्मिती वाढली आहे. या कार पाच ते सहा लाखांच्या टप्प्यात आल्या, तर मोठा फायदा होऊ शकतो. सर्वात महत्वाचे म्हणजे चार्जिंग स्टेशन्सची उपलब्धता असणे गरजेचे आहे. तसेच कार चार्जिंगला कमी कालावधी लागल्यास मोठा फायदा होईल.

दरम्यान, केंद्र सरकारने १ एप्रिल ते १० ऑक्टोबर या कालावधीमध्ये ११.२५ लाख कोटी रुपयांचा निव्वळ प्रत्यक्ष कर जमा केला आहे. यामध्ये कॉर्पोरेट कर ४.९४ लाख कोटी रुपये आणि वैयक्तिक प्राप्तिकर ५.९८ लाख कोटी रुपये आहे. प्राप्तिकर विभागाने एका वर्षापूर्वी (१० ऑक्टोबर २०२३ पर्यंत) ९.५१ लाख कोटी रुपयांचा प्रत्यक्ष कर जमा केला होता. वार्षिक आधारावर त्यात १८.३५ टक्क्यांची वाढ झाली आहे. २.३१ लाख कोटी रुपयांचा परतावाही दिला. हे प्रमाण गेल्या वर्षीच्या याच कालावधीपेक्षा ४६ टक्के अधिक आहे. गेल्या वर्षी १० ऑक्टोबरपर्यंत सरकारने १.५८ लाख कोटी रुपयांचा परतावा दिला होता. सरकारने २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी प्रत्यक्ष कराच्या माध्यमातून २२.०७ लाख कोटी रुपये उभारण्याचे लक्ष्य ठेवले आहे. थेट सर्वसामान्यांकडून वसूल केल्या जाणाऱ्या कराला प्रत्यक्ष कर म्हणतात. प्रत्यक्ष करांमध्ये कॉर्पोरेट आणि वैयक्तिक प्राप्तिकराचा समावेश होतो. शेअर्स किंवा इतर मालमत्तेवर लादलेल्या करालाही प्रत्यक्ष कर म्हणतात. सामान्य लोकांकडून थेट घेतल्या न जाणाऱ्या परंतु वसूल केल्या जाणाऱ्या कराला अप्रत्यक्ष कर म्हणतात. यामध्ये उत्पादन शुल्क, कस्टम ड्युटी, जीएसटी यांचा समावेश होतो. यापूर्वी देशात अनेक प्रकारचे अप्रत्यक्ष कर होते; परंतु १ जुलै २०१७ पासून सर्व प्रकारचे अप्रत्यक्ष कर जीएसटीमध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत. पेट्रोलियम पदार्थ आणि अल्कोहोलवरील कर सध्या जीएसटीच्या कक्षेतून वगळण्यात आले आहेत. कोणत्याही देशातील आर्थिक क्रियाकलाप तपासण्यासाठी करसंकलन हे निदर्शक मानले जाते. भारतातील प्रत्यक्ष करसंकलन यंदा चांगले झाले आहे.

आता एक खास बातमी. ऑनलाइन पैसे ट्रान्सफर करताना अनेक वेळा बँक ग्राहक चुकीच्या खात्यात पैसे ट्रान्सफर करतात; मात्र लवकरच बँक ग्राहकांकडून होणाऱ्या अशा चुका कमी होतील आणि फसवणुकीलाही आळा बसेल. रिझर्व्ह बँकेने 'रिअल टाइम ग्रॉस सेटलमेंट सिस्टीम' आणि 'नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर'सह व्यवहार पूर्ण करण्यापूर्वी, निधी पाठवणारी म्हणजेच पैसे हस्तांतरित करणारी व्यक्ती प्राप्तकर्त्याच्या नावाची पडताळणी करण्यास सक्षम असेल. रिझर्व्ह बँकेने लाभार्थी खाते नाव शोधण्याची सुविधा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. 'यूपीआय' आणि 'आयएमपीएस'मध्ये लाभार्थी पडताळणीची सुविधा आहे. सध्या, यूपीआय' किंवा 'इमिजिएट पेमेंट सर्व्हिस' (आयएमपीए) द्वारे पैसे हस्तांतरित केले जातात, तेव्हा पैसे पाठवणाऱ्याला, म्हणजे पैसे हस्तांतरित करणाऱ्या व्यक्तीकडे, पेमेंट व्यवहार करण्यापूर्वी प्राप्तकर्त्याची ओळख सत्यापित करण्याचा किंवा नावाची पडताळणी करण्याचा पर्याय असतो; परंतु ही सुविधा 'आरटीडीएस' किंवा 'एनईएफटी'प्रणालीमध्ये उपलब्ध नव्हती.

चलनविषयक धोरण समितीच्या बैठकीनंतर आपल्या भाषणात रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास म्हणाले की आता 'रियल टाइम ग्रॉस सेटलमेंट सिस्टीम' आणि 'नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर', 'यूपीआय' आणि 'आयएमपीएस'द्वारे निधी हस्तांतरित करण्यासाठी अशी सुविधा सुरू करावी, असे प्रस्तावित आहे. ही सुविधा सुरू केल्याने पैसे पाठवणारे 'आरटीजीएस' किंवा 'एनईएफटी' द्वारे निधी हस्तांतरित करण्यापूर्वी खातेधारकाच्या नावाची पडताळणी करू शकतील. यामुळे चुकीच्या खात्यात पैसे जमा होण्याची शक्यता कमी होईल आणि फसवणूकदेखील टाळता येईल.

या वर्षी सणासुदीचा हंगाम असूनही, रिअल इस्टेट विकासक ऑफर आणि सवलतींचा खेळ खेळताना दिसत नाहीत. दर वर्षी नवरात्रीपासून दिवाळीपर्यंत बाजारात एवढ्या प्रकारच्या ऑफर्स येत होत्या, की काय करायचे असा संभ्रम लोकांच्या मनात होता; पण यंदा बाजारात मोठ्या ऑफर्स दिसत नाहीत. गेल्या काही महिन्यांमधील प्रचंड विक्रीमुळे विकासकांकडून आणखी घरे उपलब्ध होत नसल्याचे जाणकारांचे मत आहे. अशा परिस्थितीमध्ये त्यांना ग्राहकवर्गाला ऑफर देण्याची गरज वाटत नाही. सध्या बाजारात स्वस्त आणि मध्यमस्तरीय किमतीची घरे मोठ्या प्रमाणात शिल्लक नाहीत.

गेल्या काही वर्षांमध्ये रिअल इस्टेट क्षेत्र या समस्येशी झुंजत होते. यामुळे त्यांना इन्व्हेंटरी साफ करण्यासाठी मोठ्या सवलती आणि ऑफरचा अवलंब करावा लागला. आता कोविडकाळानंतर परिस्थितीत मोठा बदल झाला आहे. लोक मोठी आणि महागडी घरे खरेदी करत आहेत. अगदी आलिशान घरांच्या बुकिंगमध्येही मोठी उडी आहे. अशा स्थितीत यादी झपाट्याने कमी झाली आहे. त्यामुळे सध्या रिअल इस्टेट विकासकांवर कोणताही दबाव नाही.

या वेळी विकसक ग्राहकांना घरासोबत कार, फर्निचर किंवा किमतीमध्ये भरभक्कम सूट अशी कोणतीही सुविधा देताना दिसत नाहीत. टॉप ७ शहरांमध्ये फार तर सोन्याची नाणी, फोन, मॉड्युलर किचन यासारख्या मोफत गोष्टी दिल्या जात आहेत. साधारणपणे दर वर्षी दिल्या जाणाऱ्या मोठ्या सवलतींच्या तुलनेत हे काहीच नाही. यापूर्वी घरांच्या किमतीत पाच ते दहा टक्के सूट दिली जात होती. याशिवाय लाखो रुपयांचा कॅशबॅकही देण्यात आला होता. काही विकसक गाड्या द्यायचे तर काही फर्निचर आणि गृहोपयोगी वस्तू द्यायचे. गेल्या महिनाभरात घरांच्या विक्रीत काहीशी घट झाली असली, तरी त्यापूर्वी झालेल्या प्रचंड विक्रीमुळे परिस्थिती गंभीर नाही. गोदरेज प्रॉपर्टीज आणि मॅक्रोटेक डेव्हलपर्स सारख्या बड्या व्यावसायिकांनी आपले संपूर्ण लक्ष प्रीमियम आणि लक्झरी हाउसिंग सेगमेंटवर केंद्रित केले आहे.

आजकाल

# पर्यटकांसाठी भारत सुरक्षित आहे का?

सूरज सामंत

भौगोलिक दृष्ट्या आपला भारत जगातील फार युनिक देशांपैकी एक आहे.... अमेरिकेप्रमाणे.

भारतात काय नाही आहे सांगा?

कोकण, गोवा, केरळ .... सारखे सुंदर समुद्र किनारे,

काश्मीर, हिमाचल, उत्तर पूर्व .... मधले हिमाच्छादित पर्वत, व्हॅलीज,

राजस्थान मधले वाळवंट, गंगा, ब्रम्हपुत्रा सारख्या मोठ्या नद्या, लडाख सारखी पठारे,

जंगले आणि वन्यजीवांमध्ये देखील वैविध्य आहे.

शिवाय जुनी संस्कृती, अजंठा एलोरा, ताजमहाल सारखे अनेक स्थापत्यशास्त्रीय नमुने, कला, लोककला, संगीत.... सगळं आहे. पण तरीही,

सध्या भारतात येणाऱ्या परदेशी पर्यटकांची संख्या २०१९ च्या संख्येएवढी सुद्धा नाही. UAE, थायलंड, इंडोनेशिया सारख्या देशांत अधिकाधिक पर्यटक जात आहेत.

उपाय म्हणून 'चलो इंडिया' नावाचे कॅम्पेन सुरु केले आहे.

(मध्यंतरी यांना इंडिया शब्दाची ऍलर्जी झालेली, ते आणि आयटीसेल भारत बोला वगैरे बडबडत होती ...असो)

चलो इंडिया मध्ये (OCI (overseas citizenship of India) धारकांना आपल्या ५ अभारतीय परिचितांना भारतात आणण्यासाठी प्रोत्साहित केले जात आहे.

प्रयत्न आणि उद्देश म्हणावा तर चांगला आहे पण पुरेसा आहे का? फारसा फरक तर पडणार नाहीच आणि पडला तरी तात्पुरता असेल.



कारण पर्यटकांच्या अनुभवाचे काय ? त्यांच्या सुरक्षिततेचे काय? त्यांच्या सोयी सुविधांचे काय? आणि सर्वात महत्वाचे म्हणजे .... पर्यटकांना अपेक्षित असणाऱ्या सौहार्दपूर्ण, सागतोत्सुक, शांततामय वातावरणाचे काय?

पाकिस्तानच्या उत्तरेला असणारा प्रदेश, म्यानमार मधील जंगले, मध्य आफ्रिकेतील काही प्रदेश, दक्षिण अमेरिकेतील जंगले सुद्धा निसर्गदृष्ट्या अतिशय सुंदर आहेत. सोमालिया, उत्तर कोरिया, लिबिया, म्यानमार, तुर्कमेनिस्तान वगैरे सारख्या देशात पर्यटनयोग्य काहीच नसेल का?

पर्यटन व्यवसाय वृद्धीसाठी (विशेषतः परदेशी चलन येण्यासाठी) फक्त सौंदर्य पुरेसे नसते.

पर्यटकांना सुरक्षित वाटायला हवे, सौहार्दपूर्ण वातावरण हवे, आदरातिथ्य करणारे, भेदभाव न करणारे, इतरांना सहज स्वीकारणारे नागरिक हवे, सोयी सुविधा हव्या, स्वच्छता हवी .....

तेव्हाच परदेशी पर्यटक येतील, परदेशी चलन येईल आणि सरकारी पातळीवर तुलनेने कमी गुंतवणुकीत एका उत्पन्न क्षेत्राचा विकास होईल.

महत्वाचे म्हणजे या क्षेत्रात होणाऱ्या उत्पन्नाचे वाटप हे जास्त लोकांमध्ये होईल, असमानता कमी असेल, अधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

परंतु त्यासाठी लागणारे सुरक्षित, सौहार्दपूर्ण, द्वेषरहित वातावरण निर्मिती होते आहे का?

(परदेशी पर्यटक टार्गेट आहे. देशांतर्गत पर्यटन प्रत्येक देशात होतंच असते. अर्थात त्यासाठी देखील वरचे काही मुद्दे लागू असतात.)

इथे धर्मरक्षणासाठी मोर्चे काढा, दंगली करा सांगणारे मोकाट फिरतायत,

स्त्रियांसाठी जगातील सर्वात असुरक्षित देशांपैकी एक म्हणून गणना होऊ लागली आहे,

बेरोजगारी वाढल्यामुळे फसवणुकीचे प्रमाण, गुन्हेगारी प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढली आहे... ...

कसे करणार पर्यटकांना आकर्षित ?

(परदेशी स्थायिक असणारे भारतीय कुटुंबियांना भेटायला येतात त्यांना सुद्धा 'पर्यटक' म्हणून मोजले जाऊ लागलेत....)

लोकसंसद

## खचाखच गर्दीचे अजून किती बळी?



मध्य रेल्वेच्या डोंबिवली ते कोपर रेल्वे स्थानकांदरम्यान खचाखच भरलेल्या धावत्या लोकल ट्रेनमधून पडल्याने डोंबिवलीच्या आयुष जतीन दोशी या अवघ्या २० वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यामुळे ट्रेनमधून पडून तरुणाईचे अकाली मृत्यू होण्याचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. यापूर्वीही लोकलमधील गर्दीच्या प्रचंड रेट्यामुळे डोंबिवलीचेच भावेश नकाते (२०१५), धनश्री गोडवे (२०१६), रजनीश प्रमोद सिंग (२०१८), नितेंद्र विरेंद्र यादव (फेब्रुवारी २०१९) आणि चार्मी पासड (डिसेंबर २०१९) हे तरुणतरुणी डोंबिवली ते कोपर रेल्वे स्थानकांच्या दरम्यान ट्रेनमधून पडून मृत्यूमुखी पडले होते. मध्य रेल्वेवरील सर्वाधिक गर्दीचे रेल्वे स्थानक म्हणून डोंबिवली रेल्वे स्थानक ओळखले जाते. ट्रेनमधील गर्दीमुळे तोल जाऊन पडून मृत्युमुखी पडण्याच्या घटना प्रामुख्याने डोंबिवली ते कोपर या दोन रेल्वे स्थानकांच्या दरम्यान घडल्या आहेत. रेल्वे प्रशासनाने या अनुषंगाने अभ्यास करून अशा प्रकारच्या दुर्दैवी घटना टाळण्यासाठी डोंबिवली स्थानकातील गर्दी कमी करण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे गरजेचे आहे.

**- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१८ ऑक्टोबर**

**१८६१:-** भारताचार्य चिं. विं. वैद्य यांचा जन्म. 'दुर्दैवी रंग' ही कादंबरी तसेच 'अबलोन्नति' या लेखमालेतून त्यांनी तत्कालिन स्त्रियांच्या प्रश्नांची चर्चा केली. ग्वाल्हेरमध्ये न्यायाधीष म्हणून काही काळ काम केलेले वैद्य संस्कृतचे जाणकार होते. 'मध्ययुगीन भारत' आणि 'श्रीमन्महाभारताचे मराठी सुरस भाषांतर' ही पुस्तके त्यांनी सिध्द केली, तर इंग्रजीत 'महाभारत-अ क्रिटिसिझम' हा ग्रंथ लिहिला. **१८८४ :-** आंतरराष्ट्रीय कीर्तीचे वनस्पती वैज्ञानिक, महाराष्ट्र विज्ञान वर्धिनीचे संस्थापक आणि मराठीत विज्ञान विषयक शब्दांचे योगदान देणारे लेखक डॉ. शं. पू. आधारकर यांचा जन्म. **१८९०:-** इतिहाससंशोधक आनंदराव भाऊ फाळके यांचा जन्म. 'शिंदेषाहीच्या इतिहासाची साधने' हे त्यांचे महत्त्वाचे कार्य. यातून शिंदे राजघराण्याचा पत्रव्यवहार प्रसिद्ध. यात सुमारे १२०० पत्रे आहेत. **१८९३:-** प्राच्यविद्यापंडीत, वेदसाहित्याचे अभ्यासक हरी दामोदर वेलणकर यांचा जन्म. त्यांच्या ग्रंथसंपदेत 'जिनरत्नकोष' हा जैन ग्रंथाची वर्णनात्मक सुची. 'छंदोसुशासन' हे हेमचंद्राच्या ग्रंथाचे संपादन आणि 'ऋग्वेदातील भक्तीमार्ग' आदी ग्रंथाचा समावेश. **१९०६:-** महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी मुंबईत 'डिप्रेस्ड क्लास मिशन' ची स्थापना केली. पुढे त्यांचे बरेच लेखन या संस्थेच्या कार्याषी निगडित राहिले. **१९२७:-** कवी सुलभा रा. उपाध्ये यांचा जन्म. 'त्रिदल' हा त्यांचा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. **१९४५:-** लेखक मनोहर नामदेवराव पाटेकर यांचा जन्म. 'माती व नातू' हा काव्यसंग्रह आणि 'जिवा जगणे' ही कादंबरी त्यांच्या नावावर आहे. **१९५१:-** 'जयद्रथ विडंबन' हे नाटक १९०४ साली लिहिणाऱ्या मराठीतील आद्य महिला नाटककार हिराबाई पेडणेकर यांचे निधन. 'दामिनी' हे नाटकही त्यांनी लिहिले. तसेच आत्मचरित्र व काही कविताही त्यांनी लिहिल्या होत्या. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर आणि हिराबाईंच्या सहजीवनाबल म. ल. वऱ्हाडपांडे यांनी 'कोल्हटकर आणि हिराबाई' हे पुस्तक लिहिले आहे. **१९५६:-** भाषांतर चळवळीचे प्रणेते, जर्मन आणि स्पॅनिष भाषातज्ज्ञ; तसेच 'केल्याने भाषांतर' या त्रैमासिकाचे संस्थापक-संपादक विद्यासागर महाजन (वय ५३ वर्षे) यांचा जन्म. परकीय भाषांतील साहित्याचे थेट मराठीत अनुवाद व्हावेत यासाठी त्यांच्या 'कलास' संस्थेतर्फे त्यांनी ''केल्याने भाषांतर' या त्रैमासिकाची स्थापना केली. 'भाषांतर' या विषयाला वाहिलेल्या कार्यशाळांचे ते आयोजन करीत. प्रसिध्द जर्मन लेखिका इव्हा हेलरच्या बेस्ट सेलर पुस्तकाच्या 'दुसऱ्या जोडीदाराच्या शोधात' हा त्यांचा अनुवाद गाजला. भाषांतरीत कथांच्या अभिवाचनाचा 'तिकडून आणलेल्या गोष्टी' हा प्रयोग त्यांनी विविध शहरांत पोचविला. एक अभ्यासू रंगकर्मी, उत्तम खेळाडू आणि ट्रेकर म्हणूनही ते परिचित होते. २००९ साली त्यांचे निधन झाले. **१९८२:-** नाटयलेखक अजय ताराचंद पटले यांचे 'भुमिपुत्र' आणि 'आतंकवाद' ही नाटके प्रकाषित झाली. १९९८:- ख्यातनाम साहित्यिक शंकर बाबाजी पाटील यांचे निधन. 'टारफुला' ही ग्रामीण भागाच्या राजकीय पार्श्वभुमीवर बेतलेली त्यांची कादंबरी गाजली. 'वळीव', 'भेटीगाठी', 'धिंड' हे कथासंग्रह, 'खेळ खंडोबा', 'ताजमहालमध्ये सरपंच' हे विनोदी कथांचे संग्रह आणि 'कथा अकलेच्या कांद्याची', 'लवंगी मिरची कोल्हापुरची' ही वगनाटये त्यांची गाजली. **२००२:-** संतसाहित्यिक डॉ. गंगाधर बळवंत ग्रामोपाध्ये यांचे निधन. 'संतकाव्ये व समालोचने', 'वाङ्मयमूल्ये ४ जीवनमूल्ये', 'नीलवंती' हा काव्यसंग्रह आदी पुस्तके त्यांनी लिहिली.

**- संजय वझरेकर**
**९७५५७६६७५**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**१८ ऑक्टोबर**

१) श्रीम. भारती दिनानाथ तरे
चेंढरे, १८-१०-१९३९
२) श्रीम. वसुधा भास्कर भोसले
श्रीबाग, अलिबाग, १८-१०-१९५७

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**विमल सॉ मिल**
**उचेडे पेण**

# नवी मुंबईतील बॅनर हटवण्यास महापालिकेची सुरुवात

## दोन दिवसात कार्यवाही पूर्ण करण्याकडे कल

**। नवीमुंबई । प्रतिनिधी ।**
**विधानसभा आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. आचारसंहिता झाल्यापासून ७२ तासांत शहर फलकबाजीमुक्त करण्यात येणार असून निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार तसेच महापालिका आयुक्तांच्या आदेशानुसार महापालिकेने शहरातील फलक हटवण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे पुढील दोन दिवसांत शहर फलकमुक्त करण्याचे लक्ष्य कर्मचाऱ्यांनी ठेवले आहे.**

निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची तयारी करणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी गेल्या काही दिवसांपासून फलकबाजीतून शहर विद्रुप करुन ठेवले होते. आघाडी, युती, महाआघाडी अशा सर्वच राजकीय आघाड्यांवर विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन शहरात पक्षीय मेळावे, सभांच्या आयोजनातून शक्तीप्रदर्शनाची सुरुवात झाली होती. त्याचबरोबर फलकबाजीला ऊत आल्याचे चित्र पाहायला मिळाले. त्यातून फुकटी फलकबाजी बोकाळत असून शहराचे विद्रुपीकरण होत असल्याचे चित्र होते. परंतु आता आचारसंहिता लागू झाल्यामुळे शहर फलकमुक्त करावे लागणार आहे. नवी मुंबई शहरात चौकाचौकांत फुकट्या बॅनरबाजीमुळे शहराच्या सौंदर्याला बाधा पोहचत आहे. पालिकेच्या सर्वच विभागातील चौकांचे त्यामुळे विद्रुपीकरण होत असल्याचे पाहायला मिळत आहे. पामबीच मार्गावरही मोठ्या प्रमाणात फलकबाजी पाहायला मिळत होती. फलक लावताना नियमावली असून फलकाच्या आकारानुसार दरआकारणी होणे गरजेचे आहे. परंतू असे होताना दिसत नाही . तसेच पालिका विभाग अधिकारी कार्यालयाअंतर्गत व महापालिका अतिक्रमण विभागामार्फत अशा फुकट्या फलकबाजीवर कारवाई होताना दिसत नव्हती. आता सर्वच फलक हटवावे लागणार आहेत.



# वाचनामुळे आयुष्य घडण्यास मदत

**। बांदा । वृत्तसंस्था ।**
वाचनामुळे स्मरणशक्ती, मनाची एकाग्रता वाढते. पुस्तकेच माणसाला समृद्ध करतात. राजमाता जिजाऊंनी बाल शिवाजीला पराक्रमाच्या गोष्टी सांगून त्यांच्या शौर्याला आकार दिला होता. एखादे पुस्तक, पुस्तकातले पान आयुष्य बदलते. एक वाक्य आयुष्याचे ध्येय ठरू शकते, एवढी ताकद वाचनात आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत अनंत भाटे यांनी येथे केले.

शालेय रंगभरण व चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या उपस्थितीत पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. पहिली ते चौथी गटासाठी घेण्यात आलेल्या रंगभरण स्पर्धेतील अनुक्रमे प्रथम तीन क्रमांक विजेते शरण्या वायंगणकर, समर्थ पाटील, जागृती शिंदे यांना तसेच विहान गवस, रिया गवस यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.पाचवी ते सातवी गटासाठी घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेतील अनुक्रमे प्रथम तीन क्रमांक विजेते स्वामिनी तर्पे, अदिती सावंत, मनोज मिशाळ तसेच अंकिता झोन व रोशनी बोरपटे यांना उत्तेजनार्थ क्रमांक देण्यात आला. विजेत्यांना रोख पारितोषिक, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. व्यासपीठावर वाचनालयाचे अध्यक्ष एस. आर. सावंत, कार्यवाह राकेश केसरकर, संचालिका स्वप्नीता सावंत, लाड मित्रमंडळाचे सचिव संदीप नार्वेकर, अंकुश माजगावकर, मराठी भाषा समन्वयक परब, मुख्याध्यापक शांताराम असनकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# ‘स्टेपिंग स्टोन’ स्कूलमध्ये विद्यार्थी दिन उत्साहात

**। सावंतवाडी । वृत्तसंस्था ।**
स्टेपिंग स्टोन ग्लोबल स्कूलमध्ये डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती प्रित्यर्थ वाचन प्रेरणा दिन व जागतिक विद्यार्थी दिन साजरा करण्यात आला. सूत्रसंचालन सहावीची विद्यार्थिनी सायना अळवणी हिने केले. सहावीतील हेरंब नाटेकर याने त्याच्या वाचनातून डॉ. अब्दुल कलाम यांचा जीवनपट सर्वांसमोर उभा केला.

त्यांचे अनेक पैलू, कामाची जिद्द व विविध संस्थांमध्ये त्यांनी भारताच्या प्रगतीसाठी दिलेले मोलाचे योगदान याबद्दल माहिती दिली. वाचाल तर वाचाल, या संकल्पनेचा अर्थ पटवून दिला. प्रशालेच्या मुख्याध्यापिका प्राची साळगावकर यांनी डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना मानवंदना दिली.

आजच्या आधुनिक पिढीला साहित्याची गोडी लागावी, म्हणून वाचनाचे अनन्यसाधारण महत्त्व पटवून दिले. वाचनामुळे आपल्या ज्ञानात भर पडते आणि शब्द संपत्तीमध्येही वाढ होते. वाचन आपल्याला जगण्याचे मोल शिकविते, असे मार्गदर्शन केले. शालेय ग्रंथपाल मीनाक्षी राजावत यांनी पहिली ते सहावीच्या विद्यार्थ्यांना शालेय ग्रंथालयातील विविध प्रकारची पुस्तके वाचण्यासाठी दिली.

# आरटीओ कार्यालयाने उगारला कारवाईचा बडगा

**। खालापूर । वृत्तसंस्था ।**
तालुक्यातील तांबाटी येथे आरटीओ कार्यालयाने कारवाईचा बडगा उगारला आहे. क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक केल्या प्रकरणी दोन वहानांवार दंडात्मक कारवाई करण्यात आली. मागील काही दिवसापासून क्षमतेपेक्षा जास्त मालवाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे झालेल्या अपघातात अनेकांना आपला जीव गमवावा लागल्याने त्यांच्या कुटुंबांवर मोठे संकट कोसळले आहे. याबाबत अनेक वेळा आरटीओ विभागाकडे नियम पायदळी तुडविणाऱ्या वाहनांवर कारवाई करावी अशी मागणी करण्यात येत होती, मात्र याकडे आरटीओ विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचा सूर होता. त्यानंतर जाग आलेल्या आरटीओ कार्यालयाने खालापूर तालुक्यातील तांबाटी येथे वाहनांची तपासणी केली. यामध्ये दोन वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त माल वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आले. दोन्ही वाहनांवर दंडात्मक कारवाई केली.

# भिरवंडे परिसरात बिबट्याचा वावर

**रत्नागिरी :** येथून जवळच असलेल्या भिरवंडे परिसरात सह्याद्री पट्ट्यामध्ये जांभूळ भाबाटलेवाडी येथे सातत्याने बिबट्याचा वावर आढळून येत आहे. गेले काही दिवस वस्तीमध्ये बिबट्या वावरताना दिसत आहे. वाडीतील संतोष सावंत यांच्या घरातील सीसीटीव्हीमध्ये बिबट्याचा वावर कैद झाला आहे. रात्रीच्या वेळी त्याचा वस्तीत वावरत आहे. त्यामुळे गावामध्ये भीतीचे वातावरण आहे.

# आदिवासी वाड्यांवरील रस्त्यांची दुरावस्था

**। नेरळ । प्रतिनिधी ।**
ग्रामपंचायत हद्दीतील माथेरान डोंगराच्या पायथ्याशी वसलेल्या आनंदवाडी, आंबेवाडी, कोबंळवाडी व नवीवाडीकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यांची प्रचंड दुरावस्था झाली आहे. त्यामुळे येथील आदिवासी बांधवासह अन्य नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

मोठ्या प्रमाणात दुरवस्था झालेल्या खड्डेमय रस्त्यावरून आपला जीव मुठीत घेऊन खडतर प्रवास करावा लागत आहे. या खडतर प्रवासामुळे मान व कमरेच्या आजारांना सामोरे जावे लागत आहे. मात्र, याकडे प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

कर्जत-कल्याण राज्य मार्गाला मोहाचीवाडी ते आनंदवाडी असा जोडणारा रस्ता आहे. तर या जोड रस्त्याचे डांबरीकरणाचे काम हे या आधी शासनाच्या मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून करण्यात आले होते. मात्र, या रस्त्याची दूरावस्था झाल्याने नव्याने कर्जत कल्याण राज्यमार्ग ते मोहाचीवाडी साई मंदिर येथे सिमेंट काँक्रीटचा रस्ता तसेच, मिना पवार यांच्या घरापर्यंतचा सिमेंट काँक्रीटचा रस्ता आहे. ग्रामीण रस्ते विकास मजबुतीकरणातून हे काम करण्यात आले आहे. या वाडयांवस्त्यांच्या परिसरात मोठ्या प्रमाणात नागरिकरण वाढले असल्याने या खड्डेमय रस्त्यावरून येथील आदिवासी वाडीतील आदिवासी बांधवांसह इतर नागरिकांना आपला जीव मुठीत घेऊन खडतर प्रवास करावा लागत आहे. मध्यंतरी याची डागजुजी करण्यात आली होती. प्रशासन याकडे लक्ष का देत नाही, अशी तक्रार आहे.

# कोकणात मविआने उमेदवारांच्या पाठीशी राहावे

**। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।**
राज्यातीलसत्तापरिवर्तनासाठी कार्यकर्त्यांनी संघटनशक्ती दाखवून महाविकास आघाडीतील उमेदवाराच्या पाठीशी राहण्याचे आवाहन राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते नंदकुमार घाटे यांनी येथील कार्यकर्ता बैठकीत केले. महाविकास आघाडीचा कोणीही उमेदवार असल्यास त्याच्या प्रचारासाठी एक होण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. येथील पक्ष कार्यालयात राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाच्या कार्यकर्ता बैठकीत घाटे बोलत होते. यावेळी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष प्रकाश गुरव, मोंड उपसरपंच अभय बापट यांच्यासह ठाकरे गट युवासेना जिल्हाप्रमुख सुशांत नाईक, युवासेना तालुकाप्रमुख गणेश गावकर, फरीद काझी आदी उपस्थित होते. यावेळी घाटे यांनी, यावेळच्या निवडणुकीत संघटनशक्ती महत्त्वाची असून कार्यकर्त्यांनी एकीचे बळ दाखविण्याचे आवाहन केले. सुशांत नाईक म्हणाले, राज्यात पक्ष फोडाफोडीचे राजकारण झाले. त्याला यावेळच्या निवडणुकीत मतदार चोख प्रत्युत्तर देतील. यासाठी महाविकास आघाडी म्हणून एकत्रित राहून प्रचारावर भर देण्याची आवश्यकता आहे. सत्ता परिवर्तनाची हीच वेळ आहे. यासाठी उमेदवार निश्चित झाल्यावर महाविकास आघाडी म्हणून संयुक्तपणे प्रचाराचा श्रीफळ वाढवला जाईल. यासाठी कार्यकर्त्यांनी समन्वय राखून काम करण्याची आवश्यकता आहे. बापट यांनी, उमेदवार काणीही असूदे, तो पक्षाचा निर्णय असेल. मात्र, कार्यकर्त्यांनी एकसंघ राहून महाविकास आघाडीला बळ देण्याची आवश्यकता व्यक्त केली. उमेदवार कोण आहे, याहीपेक्षा महाविकास आघाडीचा उमेदवार मानून कार्यरत राहण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक चंद्रकांत पाळेकर यांनी केले. आभार अभय बापट यांनी मानले. नवनिर्वाचित खासदार गेल्या सुमारे पाच महिन्यांत येथील मतदारांनी पाहिलेले नाहीत. त्यांना जनतेच्या प्रश्नांची जाण आणि काही देणेघेणे नाही. माजी खासदार विनायक राऊत गावागावांत मतदारांना भेटत होते, असे सुशांत नाईक यांनी यावेळी सांगितले. अलीकडेच राष्ट्रवादी (शरद पवार गट) पक्षाच्या काही कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याचे वृत्त होते; मात्र प्रवेश करणारे कार्यकर्ते राष्ट्रवादी पक्षाचे नाहीत, असेही पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

# महाविकास आघाडी की महायुती ?

## कोकणातील पक्षीय बलाबल, कोणाचं पारड जड

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**
**विधानसभेच्या निवडणूका जाहिर झाल्यानंतर आता राजकीय घडामोडींना वेग येत आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये जागा वाटपांसाठी बैठकांचे सत्र सुरु आहे. आपापली उमेदवारी जाहीर करुन प्रचाराच्या कामाला लागता यावे. यासाठी इच्छुक उमेदवार प्रयत्नशिल असल्याचे दिसते. मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात सध्या आमदार कोण आहेत. कोणत्या राजकीय पक्षाची किती ताकत आहे. यावर एक दृष्टीक्षेप.**

### मुंबईतील आमदारांची संख्या : ३६

बोरीवली विधानसभा- सुनिल राणे (भाजप), दहिसर विधानसभा- मनिषा चौधरी (भाजप), मागाठणे विधानसभा - प्रकाश सुर्वे (शिवसेना - एकनाथ शिंदे), मुलुंड विधानसभा- मिहीर कोटेचा (भाजप) विक्रोळी विधानसभा- सुनील राऊत (शिवसेना - उद्धव ठाकरे), भांडुप पश्चिम विधानसभा- सुरेश कोपरकर (काँग्रेस), जोगेश्वरी पूर्व विधानसभा - रविंद्र वायकर (शिवसेना - एकनाथ शिंदे), दिंडोशी विधानसभा - सुनील प्रभू (शिवसेना - उद्धव ठाकरे), कांदिवली पूर्व विधानसभा - अतुल भातखळकर (भाजप), चारकोप विधानसभा - योगेश सागर (भाजप), मालाड पश्चिम विधानसभा - अस्लम शेख (काँग्रेस), गोरेगाव विधानसभा - विद्या ठाकूर (भाजप), वर्सोवा विधानसभा - भारती लवेकर (भाजप), अंधेरी पश्चिम विधानसभा - अमित साटम (भाजप), अंधेरी पूर्व विधानसभा - ऋतुजा लटके (शिवसेना - उद्धव ठाकरे), विलेपार्ले विधानसभा - पराग अळवणी (भाजप). चांदिवली विधानसभा - दिलीप लांडे (शिवसेना - एकनाथ शिंदे), घाटकोपर पश्चिम विधानसभा - राम कदम (भाजप), घाटकोपर पूर्व विधानसभा - पराग शाह (भाजप), मानखुर्द शिवाजीनगर विधानसभा - अबू आझमी (समाजवादी पक्ष), अणूशक्तिनगर विधानसभा - नवाब मलिक (राष्ट्रवादी), चेंबुर विधानसभा - प्रकाश फातर्पेकर (शिवसेना- उद्धव ठाकरे), कुर्ला विधानसभा - मंगेश कुडाळकर (शिवसेना- एकनाथ शिंदे), कलिना विधानसभा - संजय पोतनीस (शिवसेना - उद्धव ठाकरे), वांद्रे पूर्व विधानसभा - झिशान सिद्दीकी (काँग्रेस), वांद्रे पश्चिम विधानसभा - आशिष शेलार (भाजप), धारावी विधानसभा - वर्षा गायकवाड (काँग्रेस) - सध्या लोकसभेवर निवड, सायन कोळीवाडा विधानसभा - कॅप्टन तमिळ सेलवन (भाजप), वडाळा विधानसभा - कालिदास कोळंबकर (भाजप), माहिम विधानसभा - सदा सरवणकर (शिवसेना -एकनाथ शिंदे), वरळी विधानसभा - आदित्य ठाकरे (शिवसेना - उद्धव ठाकरे), शिवडी विधानसभा - अजय चौधरी (शिवसेना - उद्धव ठाकरे), भायखळा विधानसभा - यामिनी जाधव (शिवसेना - एकनाथ शिंदे), मलबार हिल विधानसभा - मंगल प्रभात लोढा (भाजप), मुंबादेवी विधानसभा - अमीन पटेल (काँग्रेस), कुलाबा विधानसभा - राहुल नार्वेकर (भाजप)

ठाणे जिल्ह्यातील आमदार : १८ भिवंडी ग्रामीण विधानसभा - शांताराम मोरे (शिवसेना - एकनाथ शिंदे), शहापूर विधानसभा - दौलत दरोडा (राष्ट्रवादी - अजित पवार), भिवंडी पश्चिम विधानसभा - महेश प्रभाकर चौगुले (भाजप), भिवंडी पूर्व विधानसभा - रईस शेख (समाजवादी पक्ष), कल्याण पश्चिम विधानसभा - विश्वनाथ भोईर (शिवसेना - एकनाथ शिंदे), मुरबाड विधानसभा - किसन कथोरे (भाजप), अंबरनाथ विधानसभा - बालाजी किणीकर (शिवसेना-एकनाथ शिंदे), उल्हासनगर विधानसभा - कुमार आयलानी (भाजप), कल्याण पूर्व विधानसभा - गणपत गायकवाड (भाजप), डोंबिवली विधानसभा - रवींद्र चव्हाण (भाजप), कल्याण ग्रामीण विधानसभा - प्रमोद पाटील (मनसे), मीरा-भाईंदर विधानसभा - गीता जैन (अपक्ष), ओवळा-माजीवडा विधानसभा - प्रताप सरनाईक (शिवसेना - एकनाथ शिंदे), कोपरी-पाचपाखाडी विधानसभा - एकनाथ शिंदे (शिवसेना), ठाणे विधानसभा - संजय केळकर (भाजप), मुंब्रा-कळवा विधानसभा - जितेंद्र आव्हाड (राष्ट्रवादी- शरद पवार), ऐरोली विधानसभा - गणेश नाईक (भाजप), बेलापूर विधानसभा - मंदा म्हात्रे (भाजप)

पालघर जिल्ह्यातील आमदार : ०६ डहाणू विधानसभा - विनोद निकोले (माकप), विक्रमगड विधानसभा - सुनील भुसारा (राष्ट्रवादी - शरद पवार), पालघर विधानसभा - श्रीनिवास वनगा (शिवसेना), बोईसर विधानसभा - राजेश पाटील (बविआ), नालासोपारा विधानसभा - क्षितिज ठाकूर (बविआ), वसई विधानसभा - हितेंद्र ठाकूर.

### रायगड जिल्ह्यातील आमदार : ०७

**पनवेल विधानसभा – प्रशांत ठाकूर (भाजप), कर्जत विधानसभा – महेंद्र थोरवे (शिवसेना–एकनाथ शिंदे), उरण विधानसभा – महेश बालदी (अपक्ष), पेण विधानसभा–रवींद्र पाटील (भाजप), अलिबाग विधानसभा–महेंद्र दळवी (शिवसेना–एकनाथ शिंदे), श्रीवर्धन विधानसभा – अदिती तटकरे (राष्ट्रवादी –अजित पवार), महाड विधानसभा – भरत गोगावले (शिवसेना–एकनाथ शिंदे),**

### रत्नागिरी जिल्ह्यातील आमदार : ०५

**दापोली विधानसभा– योगेश कदम (शिवसेना–एकनाथ शिंदे), गुहागर विधानसभा –भास्कर जाधव (शिवसेना–उद्धव ठाकरे), चिपळूण विधानसभा – शेखर निकम (राष्ट्रवादी–अजित पवार), रत्नागिरी विधानसभा–उदय सामंत (शिवसेना–एकनाथ शिंदे),राजापूर विधानसभा – राजन साळवी (शिवसेना – उद्धव ठाकरे)**

### सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आमदार : ०३

कणकवली विधानसभा- नितेश राणे (भाजप), कुडाळ विधानसभा- वैभव नाईक (शिवसेना- उद्धव ठाकरे), सावंतवाडी विधानसभा- दीपक केसरकर (शिवसेना- एकनाथ शिंदे)

रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्गमधील पक्षनिहाय विद्यमान लोकप्रतिधींची संख्या- १)रत्नागिरी जिल्हा, भाजप : ०, शिवसेना (शिंदे गट) : २, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) : ०, शिवसेना (ठाकरे गट) : २, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) : १, २) रायगड जिल्हा भाजप : ३, शिवसेना (शिंदे गट) : ३, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) : ०, शिवसेना (ठाकरे गट) : ०, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) : १, ३)सिंधुदुर्ग जिल्हा, भाजप : १, शिवसेना (शिंदे गट) : १, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) : ०, शिवसेना (ठाकरे गट) : १, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट ) : ०

# संस्कार शिक्षण संस्थेचा रौप्य महोत्सव उत्साहात

**। गडब । वार्ताहर ।**
पेण तालुक्यातील गडब येथील संस्कार शिक्षण संस्थेचा रौप्य महोत्सव गडब येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी सामजिक कार्यकर्ते तथा आर्किटेक्ट अतुल म्हात्रे, माजी जिल्हापरिषद सदस्य संजय जांभळे, संस्थेचे अध्यक्ष, संजय चवरकर, माजी मुख्याध्यापक के.पी. पाटील, शाळेचे मुख्याध्यापक चितामंन मोकल, डोलवीचे उपसरपंच रोहन म्हात्रे, शिवसेनेचे उपतालुका प्रमुख हिराजी चोगले, प्रथमेश मोकल, विश्वनाथ पाटील, पी. वाय. पाटील, संदिप म्हात्रे, महेंद्र पाटील, दिनेश म्हात्रे, महेंद्र ठाकुर, अजित कोठेकर, प्रभावती मोकल, गणेश तांडेल, रांजेद्र शेलार आदि मान्यवरांसह संस्थेचे आजी माजी विद्यार्थी पालक नागरीक उपस्थित होते.

संस्कार शिक्षण संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त संस्थेच्या गडब संस्कार विद्यालयात सत्यनारायणांची महापुजा, महेंद्र पाटील कळवे यांचे भजन, मान्यवरांचा सन्मान माजी विद्यार्थी व मान्यवरांचा सन्मान, स्मरणिका प्रकाशन करण्यात आले. ढोलकीच्या तालावर विजेती नेहा पाटील यांचे नुत्य, सांस्कृतिक कार्यक्रम शालेय विद्यार्थी नुत्य, माजी विद्यार्थाचे नुत्य, आदिवासी मुलींचे नृत्य , शालेय पालकांचे नृत्य, निमंत्रीत समुह नुत्य आदि कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

## २० ऑक्टोबरला २०० साकलस्वारांचा सहभाग

# रोलर कोस्टर सायक्लोथॉन स्पर्धेचे आयोजन

**। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।**
**सायकलिस्ट क्लबतर्फे रोलर कोस्टर सायक्लोथॉन स्पर्धेचे आयोजन येत्या रविवारी (ता. २०) करण्यात आले आहे. भाट्ये ते गावखडी व परत भाट्ये या मार्गावर स्पर्धा होणार आहे. देशाच्या विविध भागांतून दोनशे सायकलिस्ट सहभागी होत आहेत. पेडल फॉर बायोडायवर्सिटी अशी संकल्पना या स्पर्धेची असून कोकण कनेक्ट मुव्हमेंटची सुरुवात होत आहे.**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाच्या स्वीप या कार्यक्रमांतर्गत मतदार जनजागृतीसुद्धा या स्पर्धेच्या निमित्ताने केली जाणार आहे. या स्पर्धेसाठी रोलर कोस्टर सायक्लोथॉन पॉवर्ड बाय हॉटेल विवेक या स्पर्धेसाठी सुवर्णसूर्य फाऊंडेशन, लायन्स क्लब ऑफ रत्नागिरी, रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती बँक, महाराष्ट्र शासन पर्यटन संचालनालय, भारत निवडणूक आयोग, जय हनुमान मित्रमंडळ, दीपक पवार यांच्याकडून विशेष मार्गदर्शन, सहकार्य लाभले आहे.



स्पर्धेच्या मार्गावर सार्वजनिक बांधकाम खात्याने रस्ते सुस्थितीत ठेवण्याकरिता विशेष लक्ष दिले आहे. मार्गावरील सर्व ग्रामपंचायती व शाळांनी महत्वाचे सहकार्य केले आहे. रत्नागिरीकरांनी ही स्पर्धा पाहण्यासाठी आवर्जून यावे, असे आवाहन क्लबतर्फे करण्यात आले आहे. ५ जानेवारीला सलग दुसऱ्या वर्षी रत्नागिरी कोकण कोस्टल हाफ मॅरेथॉन व मार्चमध्ये अल्ट्रा मॅरेथॉनचे आयोजन केले आहे. रत्नागिरीमध्ये पर्यटन वाढले पाहिजे याकरिता ही स्पर्धा महत्वाची ठरणार आहे. हॉटेल विवेक येथे स्पर्धेबाबत रत्नागिरी सायकलिस्ट क्लबतर्फे पत्रकार परिषदेत माहिती देण्यात आली. त्या वेळी एसआर दर्शन जाधव, एसआर विनायक पावसकर, एसआर महेश सावंत, एसआर डॉ. नितीन सनगर, प्रसाद देवस्थळी, ॲड. सचिन नाचणकर, एसआर डॉ. राज कवडे, एसआर ओंकार फडके, योगेश मोरे उपस्थित होते.

सायकल स्पर्धा सकाळी ६.३० वा. भाट्ये येथून सुरू होणार आहे. कसोप, फणसोप, वायंगणी, गोळप, पावस, मेर्वी, गावखडी या मार्गावरून पुन्हा याच मार्गाने भाट्ये येथे स्पर्धा संपेल. सुमारे ४८ किलोमीटरचे हे अंतर असून, यात राज्यभरातून नामवंत सायकलपटू सहभागी होणार आहेत. स्पर्धेत पुरुष, महिलांचे वेगवेगळे गट केले असून यामध्ये जवळपास १ लाख १० हजारांची बक्षिसे, ट्रॉफी देण्यात येतील. जे सायकलिस्ट सायक्लोथॉन पूर्ण करतील त्यांना आकर्षक फिनिशर मेडल देऊन कौतुक करण्यात येणार आहे.

निवडक

## प्रश्नमंजुषेचे आयोजन

**बोर्लीपंचतन :** श्रीवर्धन येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यालयात मंगळवारी (दि.१५) डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्म दिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. श्रीनिवास जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक उपक्रम घेण्यात आले. एनएसएस कार्यक्रम अधिकारी किशोर लहारे यांनी डॉ. कलाम यांचे 'जीवन चरित्र' कथन केले. ग्रंथपाल सागर कुंभार यांनी कलाम यांच्या जीवनावर ऑनलाईन प्रश्नमंजुषा व ग्रंथप्रदर्शन १२ तास वाचन आयोजित केले होते.

## ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन

**तळा :** तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द.ग.तटकरे महाविद्यालयात मराठी व ग्रंथालय विभागाच्यावतीने ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस म्हणून 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करण्यात आला. यावेळी ग्रंथालयात ग्रंथप्रदर्शन भरण्यात आले होते. यावेळी कलाम यांचा जन्म ते राष्ट्रपती पदापर्यंतचा प्रवास याविषयी ग्रंथपाल मनोज वाढवळ यांनी माहिती दिली. या ग्रंथप्रदर्शनामध्ये कलाम यांची पुस्तके तसेच सामाजिक, राजकीय, कथा, कादंबरी, नाटक, विज्ञान, तंत्रज्ञान अशी पुस्तके ठेवण्यात आली होती.

## मुरुडचे जनजीवन विस्कळीत

**कोर्लई :** मान्सूनने मंगळवारी (दि.१५) देशाचा निरोप घेतला तरी जाता जाता या पावसाने जनजीवन विस्कळीत करून टाकले. सलग तिसऱ्या दिवशीही पावसाने मुरुडला हजेरी लावली होती. वीजांच्या गडगडाटासह मुरुडमध्ये पाऊस बरसल्यामुळे शेतकरी वर्ग चिंतेत पडला आहे. तालुक्यातील बोरली मांडला, कोर्लई, बार्शीव, काशीद, सर्वे, नांदगाव, मजगाव आगारदांडा, सावली, उसडी, नांदले, टोकेखार, तेलवडे, खारआंबोली या परिसरातील परतीच्या पावसाचा जनजीवनावर परिणाम दिसून येत आहे.

## राणेंची उपाध्यक्षपदी निवड

**मुंबई :** लासगो स्कॉटलंड-युनायटेड किंगडम येथे १५ व १६ ऑक्टोंबर रोजी झालेल्या 'इंडस्ट्रियल ग्लोबल युनियन शिपबिल्डिंग' आणि 'शिपब्रेकिंग वर्ल्ड कॉन्फरन्स' या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये या क्षेत्राचे उपाध्यक्ष म्हणून मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्प्लॉईज युनियनचे सेक्रेटरी विद्याधर राणे यांची पुन्हा एकदा एकमताने निवड करण्यात आली आहे. या अगोदर नागासाकी-जपान येथे २०१४ आणि सिंगापूर येथे २०१८ साली झालेल्या परिषदेत विद्याधर राणे यांची एकमताने निवड झाली होती.

## चरण पुस्तकाचे प्रकाशन

**कर्जत :** पनवेल येथे वास्तव्यास असलेल्या स्वामी समर्थांच्या भक्त नीलिमा श्रीकृष्ण काळे (७५) यांनी स्वामी समर्थांच्या आलेल्या अनुभुतींवर आधारित 'लागता श्री स्वामी समर्थांचे चरण' या पुस्तकाचे प्रकाशन केले. नेरूळ येथे वास्तव्यास असणारे निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त जगदीश जाधव यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी विजया गोवित्रीकर, कल्पना करंदीकर, केकान, जगदीश दवे, अमोल क्षीरसागर, वरद काळे, रमणी काळे, राजू पोतदार, अशोक शितोळे, अमोल चौधरी आदी उपस्थित होते.

# जिताडा नामशेष होण्याच्या मार्गावर

### ■ कोकणातील बदलत्या वातावरणाचा परिणाम

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**
**मोठमोठे उद्योगपती व नेत्यांना रायगडच्या जिताडा माशाच्या चवीची भुरळ पडते. परंतु, वैशिष्ट्यपूर्ण चव असलेला रायगडचा हा जिताडा मासा आज नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. यामुळे ही खवय्ये व मत्स्य प्रेमींसाठी चिंतेची बाब असल्याचे बोलले जात आहे. एक काळ असा होता की, जिताडा खाण्यासाठी खास मुंबई पुण्यातून लोक येत असे. विशेष म्हणजे देशाचे माजी कृषिमंत्री शरद पवार यांना देखील रायगड मधून जिताडा जात असे.**





पूर्वी समुद्रातून खाडीत आणि खाडीतून थेट भात शेतीत जीताडे प्रवेश करायचे. भात कापणीच्या काळात कोकणात हमखास घराघरात जिताड्याचा बेत ठरलेला असायचा. जिताड्याच्या चवीची ख्याती इतकी पसरलेली आहे की मुंबईत राहणारे चाकरमानी खास सुट्टी टाकून कापणीच्या हंगामात जिताडा खायला गावी येत असे. जीताड्याच्या या चवीची भुरळ मोठमोठे उद्योगपती यांसह राज्यातील राजकीय नेत्यांना देखील पडते.

कोकणातील बदलत्या वातावरणाचा जिताडा माश्यांच्या प्रजननावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. खाड्यांमधील कांदळवने ही या माशाचा नैसर्गिक अधिवास आहे. जिल्ह्यातील कांदळवने रासायनिक कंपन्यांमधून समुद्रात सोडल्या जाणाऱ्या रसायनमिश्रीत सांडपाण्याच्या विळख्यात सापडली आहेत. वाहून आलेला कचरा, पाण्यावर, चिखलावर तरंगणारे तेलतवंग यामुळे या माशांची अंडी घालण्याची ठिकाणे संकटात आली आहेत. याचा परिणाम म्हणजे खाडीत, शेतात आढळणारा जिताडा मासा आता केवळ खोल समुद्रात आढळून येत आहे. यामुळे कोकणातील खाद्य संस्कृतीचे वैशिष्ट्य बनलेला जिताडा मासा खाडीतून नाहीसा होत चालला आहे.

खाडीतील जिताडा आणि इतर वैशिष्ट्यपूर्ण माशांच्या प्रजाती कमी होणे ही कोकणातील अर्थकारण आणि जैव विविधतेच्या दृष्टीने धोक्याची घंटा आहे. जिताड्यासह खाड्यांमधील ४८ मत्स्य प्रजातींवर प्रतिकूल परिणाम झालेला आहे.

### जिताडा माशाची वैशिष्ट्ये

**जिताड्याचे शरीर लांबट असून डोक्यावर खोलगट भाग असतो. कल्ल्याच्या पुढील भागात एक छोटासा काटा असतो. जिताडा मासा आयुष्यातील २ ते ३ वर्षे गोड्या पाण्यात राहतो. प्रजननक्षम मादीसोबत नर किनाऱ्यालगत स्थलांतर करतात. किनाऱ्यालगत कांदळवनात मादी अंडी घालते. माशाचा रंग करडा हिरवा व शरीरावर जांभळ्या रंगाच्या छटा तर पोटाचा भाग चंदेरी असतो. एका प्रजननक्षम जिताडा माशाची लांबी ४५ ते ६१ सेमी असते.**

> **"रायगड जिल्ह्यातीली अलिबाग, पेण व खारेपाट विभागात पूर्वी जिताडा मुबलक प्रमाणात मिळत होता. यामुळे त्याची किंमत देखील कमी होती. आता कृत्रिम तळ्यातील संगोपनाचा खर्च वाढल्यामुळे साहजिकच जीताड्याची किंमत खूपच वाढलेली आहे. खाडीत, शेतात मिळणारा आणि कृत्रिम तळ्यातील जिताडा यांच्या चवीत जमीन अस्मानाचा फरक आहे."**
> **– दामोदर धुमाळ, मत्स्य व्यावसायिक, दिवलांग**

> **"पूर्वी आम्ही लहान असताना शेतात कापणीच्या वेळेस शेतातील पाण्यात जिताडे मोठ्या प्रमाणावर आढळत होते. मात्र, आता जिताडे नजरेस देखील पडत नाहीत. हे मत्स्य धन घटत असून ही चिंतेची बाब आहे."**
> **– धनंजय धुमाळ, स्थानिक, दिवलांग पेझारी**

## खांब येथे शेती विषयक कार्यक्रम संपन्न




**। खांब । वार्ताहर ।**
रोहा तालुक्यातील खांब येथे दापोली येथून आलेल्या कृषी दूतांकडून विविध प्रकारचे कृषी विषयक कार्यक्रम संपन्न करण्यात आला.

या कार्यक्रमांतर्गत बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, अधिनस्त कृषी विज्ञान केंद्र रोहा मार्फत आणि कृषी महाविद्यालय दापोलीच्या ग्रामीण जागृती कार्यानुभव कार्यक्रम (रावे) अंतर्गत कृषी दुतांनी अझोला निर्मितीचे प्रत्याशिक शेतकऱ्यांना दाखवले. तसेच, आजोला सेंद्रिय खत म्हणून वापरता येतो, जो मातीला पोषण देतो. आजोला नायट्रोजन जिवाणूंना आश्रय देते, ज्यामुळे मातीतील नायट्रोजन प्रमाण वाढते. आजोला जैवविविधता वाढवतो आणि जलाशयांचे पारिस्थितिकी संतुलन राखतो. आजोला प्रथिनांचे चांगले स्रोत आहे, ज्यामुळे तो गुरांसाठी पोषणयुक्त खाद्य बनवितो. अशाप्रकारची माहिती येथील शेतकरी वर्गाला दिली.

या प्रत्याक्षिकासाठी डॉ. प्रसादे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच, कृषी विज्ञान केंद्र किल्ला येथील डॉ. मनोज तलाठी, डॉ. जीवन आरेकर यांनी उपस्थितीतांना मार्गदर्शन केले.

## सम्राट अशोका विजयादशमी उत्साहात




**। तळे । वार्ताहर ।**
तळा तालुक्यातील भारतीय बौद्ध महासभा, बौद्धजन पंचायत समिती तसेच तळा तालुका बौद्धजन सेवा संस्था (रजि.) रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि.१२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे सम्राट अशोका विजयादशमी तथा धम्म चक्र प्रवर्तन दिन संपन्न झाला.

प्रथमतः तळा शहरातील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे रायगड जिल्हा दक्षिणचे माजी सरंक्षण उपाध्यक्ष आयु. आनंद माळी, समता फोर्सचे सैनिक, डिव्हिजनल ऑफिसर, सहाय्यक शिक्षक आयु. प्रशांत माळी, अंकुश माळी, विशाखाताई कासारे, समता सैनिक दलाचे महिला व पुरुष एकूण २६ जवान व उपस्थित उपासक, उपासिका यांच्या वतीने महामानवाला मानवंदना देण्यात आली. यावेळी तळा तालुका माजी अध्यक्ष भीमराज जाधव, प्रकाश गायकवाड, केशव लोखंडे व उपस्थित शेकडो भिम अनुयायी यांनी सामुदायिक वंदना, त्रिसरण, पंचशील सुत्रपठण पठण केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा तळा व रायगड दक्षिणचे माजी अध्यक्ष आयु. विजय जाधव हे होते. यावेळी मनोहर गायकवाड, सारिका नाक्ते, साक्षी गायकवाड, अशोक पवार, किरण जाधव, गीता जाधव, प्राध्यापक भवरे, प्राध्यापिका भवरे, ॲड. किरण अडखळे, धनंजय पवार आदी मान्यवर उपस्थित होते.



## जागतिक हात धुणे दिवस साजरा

**। सुतारवाडी । वार्ताहर ।**
कुडली येथील राजिप शाळेत डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीचे औचित्य साधून शाळेत 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करण्यात आला. या दिनामध्ये पहिली ते सातवी इयत्तेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यावेळी अब्दुल कलाम यांच्या विषयी माहिती देताना मोहन राठोड यांनी सांगितले की, कलाम हे २००२ ते २००७ या कालावधीत आपल्या देशाचे राष्ट्रपती होते. त्यांना वैज्ञानिक संशोधनामुळे भारतरत्न देण्यात आले. यानंतर 'जागतिक हात धुणे दिवस' या निमित्त सर्व विद्यार्थ्यांना हात कसे धुवावे, हे प्रात्यक्षिक करून दाखवून सर्व विद्यार्थ्यांचे हात धुवून घेण्यात आले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सुशीला म्हात्रे, मोहन राठोड, सारिका पोटे व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

## फळपीक विमा योजना




**। नेरळ । प्रतिनिधी ।**
पुर्नचित हवामानावर आधारित फळपीक विमा योजना 'अंबिया बहार २०२४-२६' योजनेचा शेतकरी बांधवांनी लाभ घ्यावा, असे आवाहन तालुका कृषी विभागीय अधिकारी यांनी केले आहे. गेल्या तीन वर्षाच्या तुलनेत आंबा पिकाचा विमा हप्ता या वर्षी ५० टक्के कमी झाला असुन विमा संरक्षित १२ टक्के वाढ करण्यात आली आहे.

आंबा आणि काजू बागायतदार शेतकऱ्यांसाठी शासनाने आंबा आणि काजु पिकांसाठी पुनर्रचित हवामानावर आधारीत फळपीक विमा योजना शासन निर्णयाने सुरू केला आहे. रायगड जिल्हयाकरीता यूनिव्हर्रसल सम्पो जनरल इन्शुरन्स कंपनी लि. अंधेरी-मुंबई ही कंपनी नेमलेली आहे. या अंतर्गत नैसर्गिक आपत्ती व हवामानातील प्रतिकूल परिस्थितीमुळे फळपिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण मिळते. आंबा फळपिकाकरीता प्रति हेक्टर रक्कम रु. १४ हजार ४५० व काजू फळपिकाकरीता प्रति हेक्टर रक्कम रु. ६ हजार इतका विमा हप्ता आहे. गारपीट या हवामान धोक्यापासून विमा संरक्षणासाठी अतिरिक्त विमा हप्ता आंबा फळपिका करीता रक्कम रु. ४ हजार ८४५ व काजू फळपिकाकरीता रक्कम रु. २ हजार प्रति हेक्टर आहे.

## संशोधन केंद्राला निधीची गरज

**। कर्जत । प्रतिनिधी ।**
बदलत्या हवामानाने निर्माण केलेली आव्हाने पेलण्यासाठी संशोधन केंद्र अद्यावत करणे आवश्यक असून यासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. भरत वाघमोडे यांनी केले. अखिल भारतीय समन्वित भात सुधार प्रकल्प देखरेख पथकातील तज्ज्ञ शास्त्रज्ञांसोबत संशोधन केंद्राच्या प्रशिक्षण सभागृहात आयोजित बैठकीत अध्यक्षीय मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

या बैठकीत देखरेख पथकात हैद्राबादच्या भारतीय कृषी संशोधन परिषद आणि आंतरराष्ट्रीय भात संशोधन संस्थेत कार्यरत वनस्पती रोगशास्त्र विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. जी. एस. लाहा, कृषिविद्या विभागाच्या प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. श्रीदेवी, वनस्पती पैदास विभागाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. कृष्णमूर्ती, संकरित भात विभागाच्या वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. पी. रेवथी, सूक्ष्म जीवशास्त्र विभागाचे शास्त्रज्ञ डॉ.बंडेप्पा, जैवतंत्रज्ञान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. देवन्ना यांचा समावेश होता.

यावेळी डॉ. वाघमोडे यांनी अखिल भारतीय समन्वित भात सुधार प्रकल्पाच्या अहवालाचे सादरीकरण केले. ते पुढे म्हणाले की, पायाभूत सुविधा निर्माण झाल्यास कर्जतच्या संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञांमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे संशोधन करण्याची क्षमता आहे. यावेळी देखरेख पथकातील सर्व तज्ज्ञ शास्त्रज्ञांनी मनोगत व्यक्त करीत सुरू असलेल्या एकंदरीत संशोधन कार्याबद्दल गौरवोद्गार काढले.

## अब्दुल कलाम यांची जयंती साजरी



**। माणगाव । प्रतिनिधी ।**
माणगाव शहरातील उतेखोलवाडी राजिप शाळेत मंगळवारी (दि.१५) भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती व आंतरराष्ट्रीय हात धुणे दिन साजरा करण्यात आला.

सार्वजनिक स्वच्छतेसोबत वैयक्तिक स्वच्छता हि आरोग्याच्या दृष्टीने महत्वाचे आहेत. यासाठी दिवसातून कितीवेळा हात धुवावे व कसे धुवावे याचे प्रात्यक्षित विध्यार्थ्यांना दाखविण्यात आले. तसेच, मोबाईलच्या दुनियेत विविध प्रेरणादाई पुस्तके वाचनापासून विध्यार्थी वंचित राहू नयेत, विध्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला पालकांकडून शाळेला पुस्तके आणि तुळशीची रोपे व फुल झाडे भेट देण्यात आली.

## पंप मालकाचा प्रामाणिकपणा

**। कर्जत । वार्ताहर ।**
कृष्णा आंबवणे यांनी बुधवारी (दि.१६) खालापूर तालुक्यातील हाळ परिसरात असलेल्या सीएनजी पंपावर गाडीत सीएनजी भरला. त्यांच्या गाडीमध्ये ५८३ रुपयाचा सीएनजी भरला गेला आणि त्यांनी ऑनलाईन ५ हजार ५८३ रु. केले. पंप मालक श्रीमंत तांदळे यांनी हिशोब केल्यावर ५ हजार रु. जास्त आल्याचे निदर्शनास आले. त्यांनी सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून यादरम्यान कोणत्या गाडीत सीएनजी भरला याची पाहणी केली व ट्राफिक पोलीसांच्या मदतीने आंबवणे यांच्याशी संपर्क साधून त्यांना उर्वरित रक्कम परत केली.

## महर्षी वाल्मीकी जयंती साजरी



**। अलिबाग । वार्ताहर ।**
रामायण कर्मे आद्यकवी महर्षी वाल्मीकी यांची जयंती गुरूवारी (दि.१७) अलिबाग येथे साजरी करण्यात आली. याच प्रमाणे महर्षी वाल्मीकीचे जन्मस्थान जळगावा जिल्ह्यातीली वालझरी येथे आणि त्यांचे समाधीस्थळ वाल्हे येथे भव्य स्वरूपात मंदिर उभे रहावे, अशी प्रार्थना महाराष्ट्र मच्छिमार सेनेच्यावतीने करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र मच्छिमार सेनेचे मुख्य संघटक मंगेश पद्माकर कोळी, संतोष हरिभाऊ पाटील, ज्ञानदेव नागु तांडेल, जगन्नाथ ज्ञानदेव तांडेल, बाळु हरी भिकारी, यशवंत चंद्रकांत मुर्तगी, जनार्दन रामदास भगत, रामा विठोबा कोळी, डॉ. अक्षय रामा कोळी हे कोळी बांधव उपस्थित होते.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- नागाव येथे कामासाठी बाई ची आवश्यकता. घरकाम व मुलाला सांभाळणे. पगार- १२,०००/- संपर्क- ७८७५८६६५५५
- Freshers पाहिजेत : रायगड जिल्ह्यातील अनअनुभवी / नवोदित पुरुष शिक्षकांना अलिबाग येथे पूर्ण वेळ नोकरीची संधी. पात्रता : BA / MA B.Ed, BSc / MSc B.Ed, B.E. / B.Tech पगार : रु. २०,०००/- पर्यंत. अर्ज करा- honestefforts1012@gmail.com
- फ्लॅट शोधत आहात? नवीन 2BHK प्रशस्त फ्लॅट विकणे आहे. ठिकाण : मोक्याच्या जागी, अलिबाग. अपेक्षित किंमत ८१ लाख, निगोशिएबल, संपर्क :- ८२७५११९८८३.
- अलिबागमध्ये आर्किटेक्चरल फर्मकरीता फ्रेश इंटेरियर डिझाईन कोर्स केलेले ड्रॉप्समन पाहिजेत. संपर्क :- ९४२२०९४१५१.
- Rasik Hardware Alibag. 9422690854. Male Staff Requirement Experience Of Atleast 1 Year. Salary 12000.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

### माथेरानमधील धूर्त नेत्यांचा वरदहस्त

# अनावश्यक मतदारांची नावे वगळणे गरजेचे

**। माथेरान । वार्ताहर ।**
**माथेरानमधील सध्याच्या परिस्थितीत सर्व प्रभाग मिळून जेमतेम ३ हजार ९०० इतकी मतदार संख्या आहे. यातील बहुतांश मतदार हे याठिकाणी वास्तव्यास नसून त्यांचे रेशनकार्ड तसेच स्वतःच्या घराचा पुरावा देखील नाही. तर, काही मतदार हे येथे नोकरी-व्यवसायानिमित्ताने आले होते.**






फक्त माथेरान नगरपरिषदेच्या निवडणूक काळात प्रत्येक मताला पाच ते १० हजार रुपये आणि वेळप्रसंगी त्याहूनही अधिक रक्कम मिळत असल्यामुळे अशी मंडळी केवळ पाच वर्षातून एकदाच आपले दर्शन देत असतात. यामुळे अशा मतदारांची नावे सर्वपक्षीयांनी मिळून कमी करण्याची गरज असल्याची चर्चा येथे रंगू लागली आहे.

माथेरानमध्ये जे लोक बाहेरून व्यवसाय करण्यासाठी आलेले आहेत त्यातील बहुतांश मतदारांचे नाव अन्य मतदार केंद्रावर देखील आहेत. अशी बरीच नावे राजकीय पक्षांच्या धूर्त नेत्यांनी मतदार यादीत समाविष्ट केलेली आहेत. यामुळे या अनाठायी मतदारांमुळे एखाद्या धनाढ्य उमेदवारालाच याचा लाभ होत असतो. यासाठी येथील सर्वपक्षीय नेत्यांनी अशी नावे मतदार यादीमधून वगळल्यास काहीशा प्रमाणात आर्थिक बचत आणि सर्वांना फायदेशीर ठरू शकते.

माथेरान बाहेर वास्तव्यास असणाऱ्या मतदारांना लोकसभा, विधानसभेच्या निवडणुकीच्या काळात त्यांना समाधानकारक मोबदला मिळत नसल्यामुळे हे मतदार इकडे फिरकत देखील नाहीत. परंतु, जेव्हा पतसंस्था अथवा नगरपरिषदेच्या निवडणूक काळात येथील सर्वपक्षीय मंडळी चार ते पाच वेळा बाहेरील मतदारांना गोंजारण्यासाठी पायपीट करताना दिसत असतात. यामुळे या विधानसभेच्या निवडणुकीत ३ हजार ९०० पैकी जेमतेम ३ हजारच्या आसपास मतदान होण्याची शक्यता आहे.

यातच निवडणूकीसाठी आलेल्या निधीचा वापर फक्त मद्यपीसाठी खर्च केला गेला अथवा जवळच्या लोकांना जे पक्षाचे सदस्य किंवा कार्यकर्ते देखील नाहीत अशांना वाटप केले जाते. यामुळे निष्ठावंत कार्यकर्ता नाराजी व्यक्त करणार यात शंका नाही. याचाच फटका येथील निर्णायक मतांमुळे विधानसभेच्या उमेदवाराला सहन करावा लागणार आहे. यासाठी ज्या पक्षाचे उमेदवार आहेत त्यांनी आपल्या विश्वासु, निष्ठावंत सदस्यांकडून निवडणूक निधीचे वाटप करण्यात यावेत, असे स्थानिक मतदार बोलत आहेत.

# परतीच्या पावसाने केली दाणादाण

## शेतकरीवर्ग चिंतातुर, जनजीवनही विस्कळीत




**। तळा । वार्ताहर ।**

तळा तालुक्यात गेले चार दिवसांपासून पाऊसच! पाऊस!! बळीराजाच्या हातात तोंडाशी आलेला घास ओरबाडून नेत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. तयार झालेली भात शेती कापायची कशी? सकाळी कापायला सुरुवात केली तर लगेच मळभ भरुन येतंय शेतातील पाण्याचा निचरा काढायचा तर पाणी साठतंय, चित्रा नक्षत्रात एवढा पाऊस पडत नाही. पण झोडपून काढले आहे.उभी शेती आडवी होऊन फुटवे फुटले.पेंढा गुरांच्या लायकीचा राहिला नाही.

याच आश्चर्य व्यक्त करीत जनमानसात पाऊस बेभरोशी झाल्याचे बोलले जात आहे. आता हा किती दिवस पाऊस रेंगाळणार ? असा प्रश्नचिन्ह बळीराजासमोर उभा ठाकला आहे. परिणामी शेतीचे अतोनात नुकसान होत असल्याने बळीराजाही चिंतातुर झाले आहेत. महागाईने कंबरडे मोडले आहे.कमी अधिक प्रमाणात शेती करीत असले तरी निसर्गाच्या लहरीपणामुळे, वन्यप्राण्यांच्या हैदोस डुक्कर, माकड, केलटे यांचा त्रास याला देखील शेतकरी कंटाळून गेला आहे. त्यात दुष्काळात तेरावा महिना असे म्हणायची वेळ आली आहे. यंदाच्या पावसाळ्याचा परतीचा प्रवास सुरु झाला असला तरीही ऑक्टोबर हिट कमी होत नाही.

अश्विन महिन्यातील पौर्णिमा अर्थात कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी देखील तालुक्यात दुपारनंतर पावसाने पुन्हा एकदा जोरदार हजेरी लावली आहे. कोजागिरी पौर्णिमेच्या जागरणाचा बेत अनेकांनी एकीकडे आखत तयारी सुरु केली असतानाच रात्री मसालेदार दुधाच्या अविट गोडीच्या आनंदावर मात्र पावसाने पुरते विरजण टाकले आहे.

निसर्गातील अनाकलनीय बदल आणि वाढते उष्णता म ानाचा हा फटका बसत असून कधीही पडणारा पाऊस, यामुळे बळीराजाला कायम शेती करणे नुकसान कारक झाले आहे. इतका पाऊस पडूनही हवेत गारवा नसुन उलट अंगातून घामाच्या धारा वाहत आहेत. या वातावरणामुळे जनमानसाचे आरोग्यावरही त्याचे विपरित परिणाम दिसून येत आहेत. दिवाळीसण तोंडावर आहे.शेतीचे असे मोक्याचे वेळी नुकसान होणे, याचा फटका सर्वांनाच बसणार हे मात्र निश्चित आहे.

आधीच वाढती महागाई अशातच हा निसर्गाचा प्रकोपी लहरीपणा शेतीची फार मोठी हानी करीत आहे. बळीराजाचे वाट्याला तर कायमचीच चिंता आणि नुकसानच येत आहे. अशातच शासनाकडून मिळणारी भरपाई यासाठी पंचनामे करून देखील वाटाण्याच्या अक्षता लावून कितीशी भरपाई होणार असा सवाल ऐरणीवर आला आहे.

# बाऊन्सरकडून महिलांना मारहाण

**। नवीन पनवेल । वार्ताहर ।**

बाउन्सरकडून दोन महिलांना मारहाण केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात चौघाविरोधात तक्रार दाखल करण्यात आली. मात्र मारहाण होऊन देखील पोलिसांनी केवळ अदखल पत्र गुन्हा दाखल केला असून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी गायकर कुटुंबियांनी केली आहे.

सरिता वामन गायकर या भिंगारवाडी, पनवेल येथे राहत असून निलेश बाबरे हे अरोरा यांच्या कंपनीचे काम करत आहेत. सरिता गायकर आणि निलेश बाबरे यांच्या एकमेकांविरुद्ध जमिनीच्या वादातून तक्रारी दाखल आहेत. १५ ऑक्टोबर रोजी निलेश बाबरे हे सोबत इतर महिला बाउन्सर यांना घेऊन पत्रा काढण्याचे काम करत असताना सरिता गायकर व त्यांच्यासोबत त्यांची जाऊबाई रंजना यांनी हा पत्रा काढू नका, सदरची जागा आमची आहे असे बोलले असता सरिता गायकर यांना निलेश बाबरे यांनी दमदाटी केली. आणि इतर तीन महिला बाउन्सर यांनी दोघींना मारहाण केली. याप्रकरणी निलेश बाबरे आणि इतर तीन बाउन्सर महिला त्यांच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेल्या मिळकती त्या मिळकतींचे विद्यमान मालक उषा रमेश मालपानी, रा. तळवडे, ता. अलिबाग, जि. रायगड, व चारुलता रमेश मालपानी रा. सनफ्रान्सीस्को, अमेरिका यांचे कडून कायम विकत घेण्याचे ठरविलेले आहे. खालील वर्णन केलेल्या मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | मालकाचे नांव | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|---|
| तळवडे, ता.अलिबाग, जि.रायगड. | उषा रमेश मालपानी<br>चारुलता रमेश मालपानी | २६२ | ०.४०.०० | ०.८५ |

वर नमुद मिळकतीवर असलेले ग्रामपंचायत परहूर घर मिळकत क्र. ११० व ग्रामपंचायत परहूर घर मिळकत क्र. ११९ हया घर मिळकती या जाहिर नोटीशीचा विषय आहे.

तरी वर नमुद मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, गहाण, दान, लिज, पोटगी, साठेकरार, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज, बयाणापावती, लीन, चार्ज, बक्षीस, मृत्यूपत्रांकीत दान वगैरे असल्यास अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकती संबंधीच्या लेखी प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून चौदा दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर वर नमुद मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर वर वर्णन केलेल्या मिळकती बाबत कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दि. १७/१०/२०२४.

**ॲड. संपदा मनोज पाटील**
शॉप नं. ११, भास्कर को. ऑप. हौसि. सोसा.,
रामनाथ रोड, चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड.
मो. ९२२५५६६०४३.

# भिंगार येथे जागतिक अन्न दिन

**नवीन पनवेल :** रायगड जिल्हा परिषद शाळा भिंगारच्यावतीने लोकांमध्ये पौष्टिक अन्न आणि चांगल्या आरोग्याचे महत्त्व पटवून देण्यासाठी जागतिक अन्न दिन साजरा केला. सकस आहार आणि आहाराच्या सवयींबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी जिल्हा परिषद शाळेने आयोजन केले.

हेल्दी फूडदेखील चविष्ट असू शकते हे याचे महत्त्व पटवून देण्यासाठी विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला. त्यांनी निरोगी हृदय, निरोगी शरीर हा संदेश दिला होता. विद्यार्थ्यांना आरोग्यदायी जीवनशैली आणि पौष्टिक आहार तक्त्याची माहिती देण्यात आली.

# 'लागता श्री स्वामींचे चरण' पुस्तकाचे प्रकाशन



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

श्री स्वामी समर्थ यांच्या सानिध्यात आल्यानंतर वयाच्या ७५व्य वर्षी स्वामी भक्त नीलिमा श्रीकृष्ण काळे यांनी लिहिलेले लागता श्री स्वामींचे चरण या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

नवी मुंबई नेरूळ येथील रहिवाशी असलेल्या नीलिमा काळे या कर्जत जवळील पळसदरी येथील श्री स्वामी समर्थ मठाच्या नियमित सेवक आहेत.त्या अनेक वर्षे स्वामींची सेवा करीत असून स्वामी सेवेच्या सहवासाचे अनुभव काळे यांनी लागता श्री स्वामींचे चरण हे पुस्तक लिहिले आहे.या पुस्तकाचे प्रकाशन कोजागिरी पौर्णिमेला श्री स्वामी समर्थ यांच्या सहवासात झाले.या पुस्तक प्रकाशनाच्या कार्यक्रमाची सुरुवात रेडिओ जॉकी अर्चना यांनी सरस्वती वंदनाने केली. या कार्यक्रमाला विजया गोवित्रीकर, कल्पना करंदीकर, केकान, जगदीश दवे, अमोल क्षीरसागर, वरद काळे, रमणी काळे, राजू पोतदार, अशोक शितोळे, अमोल चौधरी आदी स्वामीभक्त उपस्थित होते.या पुस्तक प्रकाशन सोहळा कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिनेश अडावतकर यांनी केली.

पुस्तकाचे प्रकाशन करणारे स्वामी सेवक जगदीश जाधव यांनी आपल्या मनोगतात आपण माणसांमधील देव पहायला शिकावे आणि गरजवंत आणि वंचितांना मदत करून आपल्या जाणीवा सिद्ध कराव्यात असा संदेश दिला. तर पुस्तक निर्मिती बद्दल मीनाक्षी जयकर यांनी अनुभव कथन केले.

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील खालील वर्णन केलेला दुकान गाळा विद्यमान मालक १. श्रीमती. सीमा प्रकाश गुर्जर २. श्री. वैभव प्रकाश गुर्जर ३. श्री. राजेंद्र प्रकाश गुर्जर रा. कल्याणी अपार्टमेंट, फ्लॅट नं. १०१, १०२ बालाजी मंदिराजवळ, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड यांचेकडून विकत घेण्याचा ठरविला आहे. सदरचा गाळा निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड येथील सिटी सर्व्हे नंबर ८११ए, ८११बी, के ८९१ या मिळकतीवरील कल्याणी अपार्टमेंट सहकारी गृहनिर्माण संस्था या इमारतीमधील तळमजल्यावरील दुकान गाळा क्रमांक ६, क्षेत्र १५९ चौ. फूट बांधीव क्षेत्र (नगरपालिका मालमत्ता नंबर ALB000001546, जुना मालमत्ता नं. Z1MKT001548 मॅन्युअल मालमत्ता क्र. १२८२अ क्षेत्र ११.१८ चौ.मी.) या दुकानगाळयाचे

तरी वर नमूद केलेल्या दुकान गाळयासंदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून, मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. १७.१०.२०२४

**ॲड. विजय अनंत पेढवी**
मु.नांदाईपाडा, पो. झिराड,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८२२१८६७४०

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटिक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# कोजागरी निमित्ताने भोंडलाचे आयोजन



**भोंडला किंवा हादगा याचे कृषी संस्कृतीत विशेष महत्त्व आहे**

**कोजागरीच्या निमित्ताने भोंडलाच्या आयोजनात महिला मंडळ अध्यक्षा विद्या सोनार, हेमलता देवपुरकर, सानिका वडनेरे, सुषमा भामरे, अपर्णा मैंद, मंगल पिंगळे, नुतन देवपुरकर, सुरेखा जडे, शैला घोडके,अमृता विसपुते,रोहिणी बाविस्कर, छाया सोनार, सुलभा चांडवडकर, शुभांगी देवरे, चित्रा विसपुते, कविता विभांडिक, अलका वानखेडे मनिषा भामरे आदी महिलांनी भोंडल्याचा आनंद लुटला.**

**। बदलापूर । वार्ताहर ।**

बदलापूर अहिर सुवर्णकार महिला मंडळाच्या वतीने कोजागरीच्या शुभमहूर्तावर भोंडलाचे आयोजन बदलापूर येथे करण्यात आले होते.

कोजागरीच्या रात्री शरदाचे चांदण्यात भोंडलाचे आयोजनाची सुरुवात कुसुम वानखेडे आणि प्रभावती वडनेरे यांच्या हस्ते तसेच महिलांच्या उपस्थितीत भोंडलाचे दिप प्रज्वलन व पुजनाने सुरुवात झाली.

भोंडला नवरात्रीच्या नऊ दिवसात हस्त नक्षत्राचे प्रतीक असलेल्या हत्तीची प्रतिमा काढून मधोमध ठेवली जाते . पृथ्वीच्या सुफलीकरणाचा हा उत्सव मानला जातो म्हणून याचे महत्त्व विशेष आहे. हत्ती हा समृद्धीचे प्रतीक मानला जातो. तसेच शक्तीचे प्रतीक म्हणूनही त्याकडे पाहिले जाते. घाटावरच्या कुमारिका पाटावर डाळ तांदूळाचा हत्ती मांडून त्याभोवती फेर धरून गाणे म्हणून पूजा करतात.या सणासाठी घराच्या भिंतीवर सोंडेत माळ धरलेल्या व समोरासमोर तोंड केलेल्या दोन हत्तींचे रंगीत चित्र टांगतात. त्याच्यावर लाकडाची मंडपी टांगून तिला निरनिराळ्या फळांच्या व फुलांच्या माळा घालतात. शिवाय धान्याने हत्ती काढतात. रांगोळीच्या ठिपक्यांनी झूल काढतात. रंगीबेरंगी फुलांच्या माळा घालून त्याला सजवतात. याच भोंडल्याचे स्वरूप हादगा, भुलाबाई असे प्रदेशानुसार बदलते.

या कार्यक्रमाप्रसंगी शरदाच्या चांदण्यात आटवलेले दुध आणि महाप्रसाद उपस्थितीतांना देण्यात आला. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# गोखले महाविद्यालयात कोजागरी पौर्णिमा संपन्न



**। बोर्लीपंचतन । वार्ताहर ।**

श्रीवर्धन येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बुधवारी (दि.१६) महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. श्रीनिवास जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली व उपप्राचार्य प्रा. किशोर लहारे यांच्या नेतृत्वाखाली कोजागरी पौर्णिमेनिमित्त नाविन्यपूर्ण उपक्रम घेण्यात आला.

या दिवशी महाविद्यालयाच्या कॅम्पस मधे सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारीवर्ग कोजागरी साजरी करण्यासाठी एकत्र आले होते, या वेळी सर्व स्टाफचे दोन गृप करण्यात येऊन नव्या- जुन्या गाण्यांच्या भेंड्या रात्री ०९ ते १२ पर्यंत अत्यंत उत्साहात खेळण्यात आल्या. तसेच या वेळी सर्वांना नाष्टा व नंतर मसाले दुध वाटप करण्यात आले. हा उपक्रम गोखले एज्युकेशन सोसायटी, नाशिक या संस्थेचे अध्यक्ष, प्राचार्य,डॉ. एस. बी. पंडित यांनी सुरू केला होता. आणि या उपक्रमाचे हे सातवे वर्ष आहे.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने भारतीय संस्कृतीचे जतन तर होतेच शिवाय एकत्र येण्यामुळे विचारांची देवाण-घेवाण होत असते व शैक्षणिक समस्या सोडविण्यास मदत होत असल्याचे एनएसएस कार्यक्रम अधिकारी व उपप्राचार्य प्रा. किशोर लहारे यांनी आपले मत व्यक्त करताना सांगितले, या कार्यक्रमास दरवर्षी मोठा प्रतिसाद मिळत असतो. या कार्यक्रमास वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक-प्राध्यापकेतर कर्मचारीवर्ग उपस्थित होते. या नाविन्यपूर्ण उपक्रमाबद्दल महाविद्यालयातील स्थानिक व्यवस्थापन समितीकडून व संस्थेच्या वरिष्ठांकडून कौतुक करुण्यात येत आहे.

# विराट कवी संमेलनामध्ये ईट प्ले रीडचा आनंददायी सहभाग

**नवीन पनवेल :** जनता की पुकार काव्यमंच यांनी मोठ्यास्तरावर ४६ वा अखिल भारतीय विराट कवी संमेलन सम्मेलन गिरगाव चौपाटीवर खुल्या स्वरूपात पार पडला. कवी संमेलन संयोजिका मंजू लोढा आयोजित,जिथे पूर्ण भारतातून कविगण आले. हे औचित्य साधून ईट प्ले रीड संस्थेच्या संस्थापक अर्पणा शाह या हजर होत्या. विशेष अतिथी म्हणून व त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत ईट प्ले रीडच्या राजदूतांनी या गौरव सोहळ्यात सहभागी होवून या अभियानाचा आवाज सर्व सामान्यांमार्फत विशेष अतिथीनाही दिला.

दिनांक : १८ ऑक्टोबर २०२४

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन विकसीत करण्याकरीता घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, वारसाहक्क, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या विकसन कराराच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांबरोबर आपला विकसन करारनामा लिहुन व नोंदवुन ठेवतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे - ममदापूर, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १)गुलाम मुर्तजा मोहम्मद शफी दिवाण<br>२) मुजफ्फर गुलजार पालटे<br>३) मोहम्मद युसूफ नुरुददीन दिवाण | १४८ | १५ | ३७९-०० | ३७ | ९० |
| | १४८ | १६ | ४२०-०० | ४२ | ०० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- २०३ व २०४,
दुसरा मजला, साईधाम अपार्टमेंट,
हुतात्मा हिराजी पाटील चौक(अंबिका नाका),
पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.

सही /-
**अल्पेश अनंत कराळे**
(ॲडव्होकेट)
दिनांक:- १८/१०/२०२४
मो. नं. ९९२२३६८१२१

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे भोनंग, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली वरकस जमिन मिळकत श्री. शरद नथुराम झावरे, श्री. किशोर नथुराम झावरे व श्री. मंगेश नथुराम झावरे, राहणार ताजपूर, रामराज, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीची असून, सदर मिळकतीपैकी ०-२०-१० (हे.आर) जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरित झाला आहे. सदरील शेतजमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री.शरद नथुराम झावरे, वगैरे, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| भोनंग, ता.अलिबाग. | ४०२ | ०-५०-०० एकूण | ०-९७ |

सदर वरकस जमिन मिळकतीपैकी ०-२०-१० आर्स वरकस जमिन मिळकत.

अलिबाग,
दिनांक : १७/१०/२०२४.

सही/
**(ॲड. सतिश शंकर पाटील)**
ऑफीस - अे/१, हिराबाग सीएचएस,
टिळक रोड, अलिबाग, ता. अलिबाग,
जि. रायगड - ४०२ २०१.
खरेदीदाराचे वकील
मो.नं. ९८८१८५७५२९

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांन बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे - डोणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.-पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| मिलिंद दिनकर कोर | ९ | २ | ०-१४-०० | ० | ८१ |
| | ९ | ५ | ०-२२-५० | १ | २५ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

सही /-
कार्यालयीन पत्ता:- ए विंग, फ्लॅट नं. ४, चौथा मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका कार्यालय शेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

**ॲड.जयेश संभाजी म्हसे**
दिनांक:-१८/१०/२०२४
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेल:adv.jayeshmhase@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल समीर लक्ष्मण गवळी यांनी मौजे बहीरोळे ता. अलिबाग, जि रायगड येथील बिनशेती गट नं. १५८/ ७ क्षेत्र ३-५८-० आकार ३५-८० ही मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री सूरेश महादेव गुरव वगैरे यांजकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे कबूल केले असून, त्या आशयाचा करार संदर्भित मिळकतींचे मालक व माझे आशिलांदरम्यान झालेला आहे. संदर्भित मिळकत पूर्णत: निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या मालकांनी माझे आशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेने हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे अवधीत माझेकडे लेखी हरकत पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून दयावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक १७/१०/२०२४

सही
**(ॲड. रेखा किरण वाघ)**

## जाहीर नोटिस

अशी जाहीर नोटिस देणेत येते की, १) श्री. गणपत गोपाळ भोईर, राहणार चर्च जवळ, भिसेगाव, (कर्जत) अडीवली, जिल्हा रायगड, महाराष्ट्र-४१०२०१. यांची मौजे आशाणे, तालुका कर्जत, जिल्हा - रायगड मौजे आशाणे ग्रामपंचायत उमरोली सीमेत असलेली स्व मालकीची जमीन/वर्णन

| मौजे | सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ | पोट ख |
|---|---|---|---|
| आशाणे | ९/१ ई | ०-०५-०१० | ०-०-८० |
| आशाणे | ९/१ क | ०-२१-५० | ०-०३-८० |
| आशाणे | ९/४ | ३४-००-०० | ०० |
| आशाणे | ९/१ ड | ०-३६-९० | ०-०५-८० |

आमचे अशील श्री. वरुण प्रताप सिंह रुक्मिनी रमण सिंह यांना विकसन करारानुसार विकसित करण्यासाठी देण्याचे ठरवले आहे.

सदर मिळकतीत जर कोणाचाही कुठलाही हक्क वा हितसंबंध, खरेदी, बक्षीस, लिज, वारसा, आदलाबदल, गहाण, दान, विश्वस्त निधी, दायित्व, कब्जा, वहिवाट, जप्ती अगर कसलाही हक्क वा हितसंबंध असल्यास प्रस्तुत नोटिस प्रसिद्ध झाल्या पासून पंधरा दिवसांच्या आत आमचे कार्यलयीन पत्यावर संबंधित दस्ताच्या सत्य प्रतीसह संपर्क साधावा. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मालमत्ता देण्याचे व्यवहार पूर्ण करू शकतात. मुदतीनंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही व मुदतीनंतर घेतलेली हरकत आमचेवर व आमचे अशीलावर बंधनकारक राहणार नाही, ही जाहीर नोटिस.

**दिनांक : १८/१०/२०२४**

**सही/-**
**ॲड. रघुनाथ नारायण महाले**
पत्ता : शॉप नं १२, नवरत्न एसआरए सोसायटी,
जे. आर. बोरीचा मार्ग, सातरस्ता, मुंबई ११.
संपर्क : ८४२५८०८१३३ / ९९३०३५२७८९
इमेल : advrmahale@gmail.com

**दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लिमिटेड**
**कनमूर हाऊस, नरसी नाथा स्ट्रीट, पो.बॉ.नं. ५०८०,**
**मरजीद बंदर, मुंबई ४०० ००९.**
Email ID - manager.statepro@gmail.com

## जाहीर ऑफर सुचना

विकेंद्रित धान खरेदी योजने अंतर्गत पणन हंगाम २०२४- २०२५ मध्ये किमान आधारभूत किंमत धान खरेदी योजने अंतर्गत रायगड या जिल्ह्यात खरेदी करण्यात येत असलेल्या धानाची फोर्टीफाईड सीएमआर (FRK) भरडाई करण्यासाठी जिल्हयातील स्थानिक इच्छुक मिलधारकांकडुन सीलबंद लिफाफयामध्ये ऑफर्स मागविण्यात येत आहेत. सदर धान भरडाईसाठी स्थानिक मिलधारकांनाच प्राधान्य देण्यात येईल. इच्छुक मिलधारकांनी फेडरेशनने प्रस्तावित केलेल्या ऑफर्स फॉर्ममध्ये फक्त फोर्टीफाईड सीएमआर (FRK) तांदुळ तयार करण्याच्या ऑफर्स द्याव्यात. शासनाच्या निर्देशानुसार भरडाई करावयाच्या भाता संबंधितच्या अटी व शर्ती तसेच ऑफर्स फॉर्म व कोरे ऑफर्स फॉर्म संबंधित जिल्हा मार्केटिंग अधिकारी रायगड यांच्याकडे कार्यालयीन वेळेत प्राप्त होतील. ऑफर्स भरण्याचा कालावधी/ कार्यक्रम खालील प्रमाणे आहे.

अ) ऑफर्स विक्री कालावधी:- दिनांक १७/१०/२०२४ ते २५/१०/२०२४ (कार्यालयीन वेळेत)

ब) ऑफर्स भरण्याची अंतीम तारीख:- दिनांक २५/१०/२०२४ दुपारी २.०० वाजेपर्यंत.

क) ऑफर्स उघडयाची तारीख मा. जिल्हाधिकारी महोदय साहेब यांच्या मान्यतेने

**जिल्हा मार्केटिंग अधिकारी**
**रायगड**

पत्ता :-
जिल्हा मार्केटिंग कार्यालय, रायगड (भ्रमणध्वनी क्र. .९१६८०५९९२५ /८४०८८६६६१९)

# रायफल थ्री पोझिशन प्रकारात अखिलला कांस्य

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।
भारताच्या अखिल शेओरानने नेमबाजी विश्वचषकाच्या अंतिम टप्प्यातील स्पर्धेत ५० मीटर रायफल थ्री पोझिशन प्रकारात कांस्यपदक मिळवले.

पहिल्या दिवशी सोनम मसकरने १० मीटर एअर रायफलमध्ये रौप्यपदक पटकावले होते. सलग दुसऱ्या दिवशी भारताला अखिलने पदक मिळवून दिले. मात्र, अन्य भारतीय स्पर्धकात विशेषतः पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेतील नेमबाजांनी निराशा केली. ऑलिम्पियन रिदम सांगवान २५ मीटर स्पोर्ट्स पिस्तूल प्रकारात कांस्यपदकापासून दूर राहिली. चीनच्या नेमबाजांकडून रिदम शूटऑफमध्ये पराभूत झाली. अखिलने पॅरिस ऑलिम्पिकच्या हुकलेल्या संधीचे दु:ख कांस्यपदक मिळवून हलके केले.



**अखिल ५८९ गुणांसह पात्रता फेरीत सहाव्या स्थानावर राहिला. चेन सिंगही ५९२ गुण मिळवून अंतिम फेरीसाठी पात्र ठरला होता. मात्र, अंतिम फेरीत चेन अपयशी ठरला. त्याला सातव्या स्थानावर समाधान मानावे लागले. अखिलने ४५२.६ गुणांसह कांस्यपदक पटकावले.**

जागतिक स्पर्धेतून अखिलनेच भारतासाठी ऑलिम्पिक कोटा मिळविला होता. पण, निवड चाचणीदरम्यान झालेल्या दुखापतीमुळे त्याला अंतिम संघातील स्थान गमवावे लागले होते. मी निराशेवर मात केली आहे. लॉस एंजलिस २०२८ ऑलिम्पिक डोळ्यासमोर ठेवूनच मी तयारी सुरू केली आहे. या स्पर्धेसाठी मी कठोर मेहनत घेतली. गुडघे टेकून नेम साधण्याच्या पद्धतीत फारसे यश मिळत नव्हते. पण, अन्य दोन प्रकारात मी चांगली कामगिरी करून पदक मिळवले, असे अखिल म्हणाला.

अखिल ५८९ गुणांसह पात्रता फेरीत सहाव्या स्थानावर राहिला. चेन सिंगही ५९२ गुण मिळवून अंतिम फेरीसाठी पात्र ठरला होता. मात्र, अंतिम फेरीत चेन अपयशी ठरला. त्याला सातव्या स्थानावर समाधान मानावे लागले. अखिलने ४५२.६ गुणांसह कांस्यपदक पटकावले. त्याने ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेत्या चीनच्या लियू युकुनचे आव्हान परतवून लावले.

महिलांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशन प्रकारात भारतीय नेमबाज अपयशी ठरल्या. आशियाई क्रीडा स्पर्धेतील कांस्यपदक विजेती आशी चोक्से ५८७ गुणांसह पात्रता फेरीत नवव्या स्थानावर राहिली.


निश्चलही पात्रता फेरीतच अडखळली. तिला ५८५ गुणांसह दहाव्या स्थानावर समाधान मानावे लागले. ऑलिम्पियन विजयवीर सिधू आणि अनिश भावनाला यांनी २५ मीटर रॅपिड फायर प्रकारात निराशा केली.

# विराटच्या नावावर भलताच विक्रम

## आठ वर्षांनी झाला शून्यावर बाद

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।
भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिला सामना बेंगळुरू येथील एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळला जात आहे. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेला विराट कोहलीही रोहित पाठोपाठ तंबूत परतला. त्याला आपले खातेही उघडता आले नाही. अशा प्रकारे विराट कोहली कसोटीत तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करताना आठ वर्षांनंतर शून्यावर बाद झाला आहे.

पावसामुळे पहिला दिवसाचा खेळ रद्द झाल्यानंतर भारताने दुसऱ्या दिवशी सकाळी प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. रोहित शर्माला सातव्या षटकात बाद केल्यानंतर कोहलीने २०१६ नंतर प्रथमच कसोटीत शून्यावर बाद झाला आहे. त्याला विल्यम ओरुरकेने झेलबाद केले. वास्तविक, मानदुखीमुळे गिल आजचा सामना खेळत नसल्याने कोहलीला तिसऱ्या क्रमांकावर बढती देण्यात आली होती. त्याने ९ चेंडूंचा सामना केला आणि खाते न उघडता परतला.



विराट कोहलीने कसोटी कारकीर्दीत सर्वाधिक चौथ्या क्रमांकावर फलंदाजी केली आहे. पण जेव्हा-जेव्हा त्याला तिसऱ्या क्रमांकावर खेळायला पाठवले, तेव्हा त्याने संघाला निराश केले आहे. कसोटी क्रिकेटमध्ये तिसऱ्या क्रमांकावर एकही अर्धशतकही झळकावता आलेले नाही. यानंतरही कोहलीला तिसऱ्या क्रमांकावर पाठवण्याचा निर्णय का घेण्यात आला? असा प्रश्न चाहत्यांना पडला आहे. किसोटीत तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करताना कोहलीची सरासरी केवळ १६.१६ राहिली आहे. आतापर्यंत तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करताना त्याने केवळ ४१ धावांची सर्वोच्च खेळी साकारली आहे. म्हणजेच त्याच्या खात्यात अर्धशतकही नाही. आजच्या डावाचाही समावेश केला तर तो आतापर्यंत सात वेळा या क्रमांकावर फलंदाजीला आला आहे. विराट कोहली याआधी कसोटीतील ३२ डावांमध्ये शून्यावर बाद झाला आहे. विशेष म्हणजे शेवटच्या वेळी पण न्यूझीलंडविरुद्धच शून्यावर बाद झाला होता. हा सामना मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर खेळला गेला होता.

# भारतीय संघ पाकिस्तान दौऱ्यावर जाणार?

## पाकिस्तानचे लागले भारताच्या भूमिकेकडे लक्ष

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।
पाकिस्तानमध्ये आयोजित शांघाय सहकार्य परिषदेसाठी (एससीओ समिट) भारताकडून परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ पाठवण्यात आलं होतं. एस. जयशंकर यांच्या या दौऱ्यावेळी एका पाकिस्तानी नेत्याने त्यांची भेट घेऊन क्रिकेटच्या मुद्द्यावर चर्चा केल्याचे दावे काही प्रसारमाध्यमांनी केले आहेत. पुढच्या वर्षी पाकिस्तानमध्ये चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा खेळवली जाणार आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डची इच्छा आहे की भारताने या स्पर्धेसाठी आपला संघ पाकिस्तानला पाठवावा. मात्र, भारतीय क्रिकेट नियामक मंडळ सध्या तरी त्यास अनुकूल नाही. भारताने याबाबत अंतिम निर्णय घेतलेला नसला तरी पाकिस्तान भारतीय संघाच्या वाटेकडे डोळे लावून बसला आहे. भारताने या स्पर्धेसाठी पाकिस्तानला जाण्यास नकार दिल्यास ही स्पर्धा कदाचित पाकिस्तानबाहेर खेळवली जाऊ शकते.



**बीसीसीआयचा पाकिस्तानला हायब्रिड मॉडेलचा प्रस्ताव**

**चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मध्ये म्हणजेच पुढील वर्षी फेब्रुवारी–मार्च महिन्यात पाकिस्तानमध्ये आयोजित केली जाणार आहे. या स्पर्धेपूर्वी भारतीय संघाने पाकिस्तान दौऱ्यावर जाण्यास स्पष्टपणे नकार दिला आहे. बीसीसीआय पुढील वर्षी होणाऱ्या आयसीसी स्पर्धेसाठी आपला संघ पाकिस्तानला पाठवण्याची शक्यता फार कमी आहे. त्यामुळेच बीसीसीआयने आयसीसीला चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ हायब्रिड मॉडेलमध्ये आयोजित करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. भारताचे सामने पाकिस्तानबाहेर व उर्वरित सामने पाकिस्तानमध्ये खेळवले जावेत, असा सल्ला भारताने पाकिस्तानला दिला असल्याचं बोललं जात आहे.**

अनेक वर्षांनंतर भारतीय नेते शेजारील देशात आयोजित एखाद्या मोठ्या कार्यक्रमाला गेले होते. सीमेपलीकडून दहशतवादी कारवाया होत असताना पाकिस्तानशी सौहार्दपूर्ण वातावरणात चर्चा होऊ शकत नाही, अशी ठाम भूमिका भारतानं घेतली आहे. पण असं असलं, तरी नुकतीच भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांची मोजून २० सेकंदांसाठी पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाझ शरीफ यांच्याशी भेट झाली. आता त्यांच्यात तेवढ्या वेळात काय बोलणं झालं असेल, याबाबत तर्क-वितर्क सुरू झाले आहेत.

दरम्यान, मागील १७ वर्षांमध्ये भारतीय संघ एकदाही पाकिस्तानला गेलेला नाही. मात्र, भारताने आता पाकिस्तानला आपला संघ पाठवून उभय देशांमधील संबंध सुधारण्यासाठी पहिलं पाऊल टाकावं अशी पाकिस्तानची इच्छा आहे.

# सनरायझर्स हैदराबाद संघाला मोठा धक्का!

## कोच डेल स्टेनची आगामी हंगामातून माघार

। मुंबई । वृत्तसंस्था ।
आयपीएलचा १८ वा हंगाम २०२५ मध्ये खेळला जाणार आहे. या आगामी हंगामासाठी सर्व फ्रँचायझी त्यांच्या खेळाडूंबाबत रणनीती आखत असताना, काही संघांनी त्यांच्या कोचिंग स्टाफमध्ये बदलही केले आहेत. दरम्यान, आयपीएल २०२५ पूर्वी सनरायझर्स हैदराबाद संघाला मोठा धक्का बसला आहे. या संघासाठी वेगवान गोलंदाजी प्रशिक्षकाची भूमिका बजावणाऱ्या डेल स्टेनने एक मोठा निर्णय घेत संघातून बाहेर पडण्याची घोषणा करून सर्वांना आश्चर्य चकीत केले आहे.

डेल स्टेनने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर केलेल्या एका पोस्टद्वारे ही माहिती दिली. ज्यामध्ये त्याने स्पष्टपणे लिहिले की, तो आयपीएल २०२५ साठी येणार नाही. सनरायझर्स हैदराबाद संघाने डेल स्टेनची डिसेंबर २०२१ मध्ये वेगवान गोलंदाज प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली होती. त्यानंतर त्याने सलग तीन हंगाम ही जबाबदारी सांभाळली आहे. गेल्या आयपीएल हंगामात डेल स्टेनने हैदराबाद संघाचा नवा कर्णधार पॅट कमिन्ससोबत काम केले. ज्यामध्ये संघ अंतिम फेरीत पोहोचण्यात यशस्वी ठरला होता. डेल स्टेनने एक्सवर पोस्ट करताना लिहिले, मला आयपीएलमध्ये गोलंदाजी प्रशिक्षकाची जबाबदारी स्वीकारण्याची संधी दिल्याबद्दल मी सनरायझर्स हैदराबाद संघाचे खूप आभार मानू इच्छितो. पण मी आयपीएल २०२५ साठी परत येणार नाही. कारण, मी दक्षिण आफ्रिकेतील एसए टी-२० मध्ये सनरायझर्स इस्टर्न केपसोबत काम करणे सुरु ठेवणार आहे. एसए टी-२० मध्ये दोनदा जेतेपद जिंकणाऱ्या सनरायझर्स इस्टर्न केप सलग तिसऱ्यांदा ट्रॉफी जिंकवण्याचा प्रयत्न करणार आहे.



सनरायझर्स हैदराबाद संघाने २०२४ मध्ये खेळल्या गेलेल्या आयपीएल हंगामापूर्वी आपल्या कोचिंग स्टाफमध्ये अनेक मोठे बदल केले होते. ज्यामध्ये डॅनियल व्हिटोरीला नवीन मुख्य प्रशिक्षक बनवण्यात आले होते. त्याचबरोबर डेल स्टेनला गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून कायम ठेवले होते.

# १९ वर्षाखालील मुलींचे सराव शिबिर

## संघ निवड चाचणीचे खारघर येथे आयोजन

। रायगड । खास प्रतिनिधी ।
जिल्हा क्रिकेट असोसिएशन आयोजित १९ वर्षांखालील मुलींचे सराव शिबिर व संघ निवड चाचणी १९ व २० ऑक्टोबर २०२४ (शनिवार व रविवार) रोजी खारघर येथील इनामपुरीच्या मैदानावर आयोजित करण्यात येणार आहे.

१ सप्टेंबर २००६ नंतर जन्मलेल्या मुलींसाठी (एकोणीस वर्षांखालील) हे शिबीर असणार आहे. सदर शिबिरासाठी रायगड जिल्ह्यातील सर्व मुलींनी क्रिकेटच्या पांढऱ्या गणवेशात व आवश्यक क्रिकेट साहीत्यासह सकाळी ९:३० वाजता खारघर येथील इनामपुरी मैदानावर हजर राहायचे आहे. सर्व खेळाडुंनी सोबत आधार कार्ड (ओरिजीनल आणि फोटोकॉपी) व स्वतःचा एक पीपी साईज फोटो आणावा. सदर क्रिकेट शिबिरासाठी सहभागी होण्याकरिता कोणतेही प्रवेश शुल्क आकारण्यात येणार नाही. दोन दिवसीय शिबिरातून रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन १९ वर्षाखालील मुलींचा संघ निवडला जाणार आहे. जो ऑक्टोबर महिन्यात एमसीएतर्फे आयोजित केलेल्या अंतरजिल्हा निवड चाचणी स्पर्धेत सहभागी होणार आहे.

# विराटचे डिव्हिलियर्ससाठी पत्र

नवी दिल्ली : भारताचा स्टार क्रिकेटर विराट कोहलीने दक्षिण आफ्रिकेचा माजी फलंदाज एबी डिव्हिलियर्ससाठी पत्र लिहिले आहे. डिव्हिलियर्सचा आयसीसी हॉल ऑफ फेममध्ये समावेश झाल्यानंतर कोहलीने हे पत्र लिहिले आहे. डीव्हिलियर्सचा बुधवारी इंग्लंडचा महान खेळाडू ॲलिस्टर कुक आणि भारताच्या नीतू डेव्हिडसह आयसीसी हॉल ऑफ फेममध्ये समावेश करण्यात आला. कोहलीने लिहिले, तु तुझ्या जागेसाठी पूर्णपणे पात्र आहेस. शेवटी हॉल ऑफ फेम तुमच्या खेळावरील प्रभावाचे प्रतिनिधित्व करतो आणि तुझे योगदान खरोखरच मोठे आहे. लोक नेहमीच तुमच्या क्षमतेबद्दल बोलतात आणि ते योग्यही आहे.

# अर्जेंटिनाच्या विजयाला मेसीची लकाकी

। ब्यूनॉस आयर्स । वृत्तसंस्था ।
तारांकित फुटबॉलपटू लिओनेल मेसीने झळकावलेल्या हॅट्ट्रिकच्या जोरावर अर्जेंटिनाने दक्षिण अमेरिका विश्वचषक फुटबॉल पात्रता सामन्यात बोलिव्हियावर ६-० असा विजय मिळवला. या कामगिरीनंतर अर्जेंटिनाचे १० सामन्यांनंतर २२ गुण झाले असून ते गुणतालिकेत शीर्षस्थानी आहे. त्यांच्या तीन गुणांनी कोलंबिया संघ मागे आहे. ब्राझील संघ १६ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे.

शीर्ष सहा संघ हे विश्वचषक स्पर्धेतील आपले स्थान निश्चित करतील. ऑक्टोबरमधील यापूर्वी झालेल्या दोन टप्प्यातील सामन्यांमध्ये मेसी दुखापतीमुळे सहभागी झाला नव्हता. मात्र, या सामन्यात तो पूर्णवेळ मैदानावर होता व संघाच्या विजयात त्याने निर्णायक भूमिका पार पाडली. सामन्याच्या १९ व्या मिनिटाला गोल करत मेसीने संघाला आघाडी मिळवून दिली. यानंतर लौटारो मार्टिनेझ (४३ व्या मि.) व ज्युलियन अल्वारेझ यांनी गोल करत मध्यंतरापर्यंत संघाला ३-० अशा भक्कम आघाडीवर नेले.



दुसऱ्या सत्रात थिआगो अलमाडाने (६९व्या मि.) गोल झळकावत संघाच्या खात्यात चौथ्या गोलचा भरणा केला. मग, मेसीने तीन मिनिटांच्या आत आणखी दोन गोल करत चमक दाखवली. मेसीने दोन गोल करण्यात साहायही केले. अन्य सामन्यात, राफिन्हाच्या दोन गोलच्या जोरावर ब्राझीलने पेरूवर ४-० अशा फरकाने विजय नोंदवला. सामन्यातील पहिला गोल राफिन्हाने करत संघाला आघाडीवर नेले. दुसऱ्या सत्रात ब्राझीलने आपला खेळ उंचावताना तीन गोल केले. यामधील एक गोल राफिन्हा तर, अन्य गोल आंद्रेआस पेरेरा (७१व्या मि.) व लुईझ हेन्रिक (७४व्या मि.) यांनी केले.

# आमच्या खेळाडूंकडे ताकद नाही, म्हणून षटकार लगावत नाहीत

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।
भारत वि बांगलादेश मालिकेनंतर बांगलादेशचे सहायक प्रशिक्षक यांनी बांगलादेशच्या खेळाडूंवर मोठे वक्तव्य केले आहे. टी-२० मालिकेतील भारतीय फलंदाज आणि बांगलादेशच्या फलंदाजांमधील सर्वात मोठा फरक म्हणजे षटकार मारण्याची क्षमता. भारतीय फलंदाजांनी दोन सामन्यात २२ षटकार ठोकले. तर बांगलादेशला फक्त आठ षटकार मारता आले. नितीश रेड्डीने एकट्याने इतके षटकार मारले आहेत. याबाबत बांगलादेशचे सहाय्यक प्रशिक्षक निक पोथास यांना विचारले असता त्यांनी यासाठी बांगलादेशी खेळाडूंच्या शरीर प्रकृतीला जबाबदार धरले. ते म्हणाले की, १०० किलो वजन असलेला खेळाडू आणि ६५ किलो वजन असलेला खेळाडू यात फरक असतो.

निक पोथास म्हणाले, त्यांच्याकडे (भारताकडे) खूप मजबूत खेळाडू आहेत. आम्ही ताकद आणि कंडिशनिंगवर काम करतो, पण तुम्ही शरीरप्रकृतीशी तर लढू शकत नाही. त्यानंतर दक्षिण आफ्रिकेच्या पोथास यांनी हा मुद्दा सविस्तरपणे मांडला. ते म्हणाले, जर एखाद्या खेळाडूचे वजन ९५-१०० किलो आणि दुसऱ्याचे वजन ६५ किलो असेल, तर स्वाभाविकपणे वजनदार खेळाडू मोठा फटका मारेल. अर्थात, वेळ आणि तंत्र महत्त्वाचे आहे आणि आम्ही त्या पैलूंवर सतत काम करत आहोत. भारतीय फलंदाजांची पॉवर हिटिंग क्षमता वाढवण्याचे श्रेय पोथास यांनी इंडियन प्रीमियर लीगला दिले. ते म्हणाले, आयपीएलचाही विचार केला पाहिजे, कारण अव्वल दर्जाचे खेळाडू असलेली ही जगातील सर्वोत्तम स्पर्धा आहे. आयपीएल आंतरराष्ट्रीय स्तरासाठी खेळाडूंना तयार करते. भारताने मारलेल्या षटकारांच्या संख्येची आमच्याशी तुलना करणे म्हणजे वेस्ट इंडिजने आमच्या तुलनेत किती षटकार मारले याची तुलना करण्यासारखे आहे.

बांगलादेशचे फलंदाज षटकार मारण्यासाठी ओळखले जात नाहीत. टी-२० सामन्यात मोठे फटके खेळणं महत्त्वाचं असतं. बांगलादेशने १७८ सामन्यांत केवळ ६९७ षटकार मारले आहेत. त्यांना एका सामन्यात ४ षटकारही मारता आले नाहीत. सर्वाधिक षटकार लगावणार बांगलादेशचा फलंदाज महमुदुल्लाह आहे. ज्याने १२९ डावांत ७७ षटकार ठोकले आहेत. त्या तुलनेत सूर्यकुमार यादवने अर्ध्या डावात (७०) जवळपास दुप्पट षटकार (१३९) ठोकले आहेत. या फॉरमॅटमध्ये त्यांचा सर्वाधिक धावा करणारा शाकिब अल हसनही एका हिटसाठी ४० चेंडू घेतो, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## पाकिस्तान वि.इंग्लंड कसोटी सामना

# बेन डकेटने मोडला सेहवागचा रेकॉर्ड

। लाहोर । वृत्तसंस्था ।
पाकिस्तान विरुद्ध इंग्लंड यांच्यात मुल्तान येथे दुसरा कसोटी सामना खेळवण्यात येत आहे. इंग्लंडने पाकिस्तानला दुसऱ्या दिवशी ३६६ धावांवर ऑलआऊट केलं. त्यानंतर इंग्लंडच्या फलंदाजांनी या धावांचा पाठलाग करायला सुरुवात केली. इंग्लंडने १२५ धावांवर २ विकेट्स गमावल्या. झॅक क्रॉली २७ आणि ओली पोप याने २९ धावा केल्या. त्यानंतर बेन डकेट आणि जो रुट या दोघांनी डाव सावरत इंग्लंडला चांगल्या स्थितीत आणलं. ओपनर बेन डकेट याने या दरम्यान शतक ठोकलं. डकेटने या शतकादरम्यान खास कारनामा करत वीरेंद्र सेहवाग याच्यापेक्षाही खास रेकॉर्ड केला.

बेन डकेट याने ३९ व्या ओव्हरमधील शेवटच्या बॉलवर आघा सलमान याला चौकार ठोकत शतक पूर्ण केलं. डकेटने ८५.८३ च्या स्ट्राईक रेटने १२० बॉलमध्ये १५ चौकारांच्या मदतीने १०३ धावा केल्या.



डकेटच्या कसोटी कारकीर्दीतील हे एकूण चौथं, इंग्लंड बाहेरील आणि आशियातील तिसरं तर पाकिस्तान विरुद्धचं दुसरं शतक ठरलं. डकेटने त्याआधी ४७ चेंडूत अर्धशतक पूर्ण केलं होतं.

**२ हजारी बेन डकेट**

**बेन डकेट याने या शतकी खेळी दरम्यान खास कारनामा केला. डकेटने कसोटी कारकीर्दीतील २ हजार धावा पूर्ण केल्या. डकेटने सर्वोत्तम स्ट्राईक रेटने या धावांचा टप्पा पार केला. डकेटने ८७.10 च्या स्ट्राईक रेटने हा पल्ला गाठला. डकेटचा हा स्ट्राईक रेट टीम इंडियाचा माजी विस्फोटक सलामीवीर वीरेंद्र सेहवाग याच्यापेक्षाही जास्त आहे. इतकंच नाही, तर डकेटने ८ व्यांदा 100 पेक्षा अधिक स्ट्राईक रेटने अर्धशतक झळकावलं. डकेटने यासह जो रुट आणि ब्रँडन मॅक्युलम यांची बरोबरी केली. याबाबतीत वीरेंद्र सेहवाग नंबर 1 आहे. सेहवागने तब्बल 17 वेळा 100 पेक्षा अधिकच्या स्ट्राईक रेटने अर्धशतकी खेळी केली आहे.**

**पाकिस्तान प्लेइंग ईलेव्हन : शान मसूद (कर्णधार), सैम अयुब, अब्दुल्ला शफीक, कामरान गुलाम, सौद शकील, मोहम्मद रिझवान (विकेटकीपर), आगा सलमान, आमेर जमाल, नोमान अली, साजिद खान आणि जाहिद महमूद.**

**इंग्लंड प्लेइंग ईलेव्हन : बेन स्टोक्स (कर्णधार), झॅक क्रॉली, बेन डकेट, ऑली पोप, जो रूट, हॅरी ब्रूक, जेमी स्मिथ (विकेटकीपर), मॅथ्यू पॉट्स, ब्रायडन कार्स, जॅक लीच आणि शोएब बशीर.**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)